# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १८ जुलै, २०१८ / आषाढ २७, १९४० (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण मंत्री**
**(३) कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**
**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७९**

---

### महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीतील गैरव्यवहाराच्या चौकशीकरिता समिती गठीत केल्याबाबत

**(१) * ४२११० प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८३७४ ला दिनांक १४ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अधिकाऱ्यांनी शासकिय नियमांचे उल्लंघन करुन आपल्या मर्जीतील मे.रेटॉक्स विकासक आणि चौरंगी विकासक तसेच अन्य कंपन्यांवर मेहरनजर करणाऱ्या दोषी व जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीमार्फत सुरु असलेल्या चौकशीअंती समितीच्या अहवालात कोणकोणत्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अद्‌याप सदर चौकशी समितीमार्फत चौकशी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकांतर्गत मराठी शाळेमधील मुलांच्या संख्येत घट झाल्याबाबत

**(२) * ४२५४० श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महानगरपालिका विविध कारणांमुळे मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा बंद करीत असून नागपूर महानगरपालिकांतर्गत मराठी शाळेमधील मुलांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट होवून एकूण ८१ मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळांपैकी ३४ शाळा बंद झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळांमध्ये असामाजिक कार्य तसेच परिसराचा वापर गैरकामाकरीता करण्यात येत आहे तसेच काही शाळांच्या परिसरात जनावरांना चरावयास नेले जात असून काही शाळांचा जनांवरे ठेवण्यासाठी वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मराठी शाळामधील मुलांच्या संख्येत वाढ होण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०१२-२०१३ ते सन २०१७-२०१८ या कालावधीमध्ये नागपूर महानगरपालिकेच्या मराठी माध्यमाच्या एकूण ३४ शाळांना कमी पटसंख्येमुळे नजीकच्या शाळेत विलीन केलेले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे नाही,

विलीन झालेल्या शाळांपैकी १४ इमारतींमध्ये सद्य:स्थितीत महापालिकेच्या अन्य माध्यमांच्या शाळा सुरु आहेत तर ०४ शाळांच्या इमारती महापालिकेच्या कार्यालयीन वापरात असून ०१ इमारतीमध्ये खाजगी शाळा सुरु आहे.

या व्यतिरिक्त महापालिकेच्या मालकीच्या ०५ शाळांच्या इमारतींपैकी ४ शाळांमध्ये केंद्रीय विद्यालय व ०१ इमारतीमध्ये पोलीस स्टेशन उभारण्याचे प्रस्तावित आहे.

शिवाय ज्या उर्वरित ०९ विलीन झालेल्या शाळांच्या इमारती खाजगी मालकांच्या असल्यामुळे सदर इमारतींचा ताबा संबंधित खाजगी मालकांकडे सुपूर्द करण्यात आलेला आहे असे नागपूर महानगरपालिकेच्या अहवालात नमूद आहे.

(३) व (४) मराठी शाळांमधील मुलांची संख्या वाढावी यासाठी, महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठ्यपुस्तक, इतर शैक्षणिक साहित्य वाटप करणे तसेच लांब अंतरावरील विद्यार्थ्यांकरीता मोफत बस सुविधा, सायकल बँक योजनेंतर्गत सायकल उपलब्ध करुन देणे, यासाठी शिक्षकांच्या कार्यशाळेचे आयोजन करणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.

-----------------

## मुंबईत अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढल्याबाबत

**(३) * ४१९१२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गत पाच वर्षात अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण तब्बल १५ पटीने वाढल्याची माहिती माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान माहितीच्या अधिकारांतर्गत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्:स्थितीत ठिकठिकाणी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे असूनही आरोपींना पकडण्यात पोलिसांना अपयश येत असल्याने ही बाबी गंभीर व चिंताजनक असून उक्त प्रकरणी शासनस्तरावरुन काय कारवाई वा उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातून अपहरण/हरवलेल्या मुली व हरवलेल्या महिलांबाबत सन २०१३ ते २०१७ या कालावधीतील वर्षनिहाय सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| सन | १८ वर्षाखालील मुली | | १८ वर्षावरील महिला | |
|---|---|---|---|---|
| | अपहरण/ हरवलेल्या | सापडलेल्या | हरवलेल्या | सापडलेल्या |
| २०१३ | ९२ | ७९ | ४०४१ | ३८२३ |
| २०१४ | १५०० | १४७५ | ४१७० | ३९४३ |
| २०१५ | ९२७ | ८७८ | ४३१५ | ४०३९ |
| २०१६ | ११६९ | १०९१ | ४५२७ | ४०९६ |
| २०१७ | १३६८ | १२३५ | ४५९९ | ३७८५ |
| एकूण | ५०५६ | ४७५८ | २१६५२ | १९६८६ |

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ७५/२०१२ "बचपन बचाव आंदोलन" संदर्भात दिनांक १० मे, २०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार १८ वर्षाखालील हरविलेल्या लहान मुलांचेबाबतीत उपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात येतो. त्यामुळे यामध्ये वाढ दिसून येत आहे.
(२) हरविलेल्या व्यक्तींचा तपास करण्यासंदर्भात प्रमाणित कार्यपध्दती (SOP) तयार करण्यात आली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ७५/२०१२ (बचपन बचाव आंदोलन) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार १८ वर्षाखालील हरविलेल्या मुल/मुली संदर्भात अपहरणांचा गुन्हा दाखल करण्यात येतो.

हरविलेल्या मुलांच्या संदर्भात खालील वेबसाईट्स कार्यान्वित आहेत.

१) www.trackthemissingchild.gov.in

२) www.mumbaipolice.gov.in

३) www.shodh.gov.in

हरविलेल्या लहान मुलांचा शोध घेण्याकरीता जुलै, २०१५ ते जुलै, २०१७ या कालावधीत ऑपरेशन मुस्कान व ऑपरेशन स्माईलच्या एकूण ६ शोध मोहिम राबविण्यात आले आहेत.

अपहरण/हरवलेल्या मुलींचा शोध घेण्यासाठी बृहन्मुंबई पोलिसांकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतात. यामुळे बहुतांश अपहरण/हरवलेल्या मुली सापडून आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहांमधील संभाव्य गुन्हे रोखण्यासाठी "सिक्रेट सर्व्हिस फंड" निधीची तरतूद करण्याबाबत

**(४) * ४१२५२ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कारागृहांमध्ये कैद्यांच्या प्रत्येक हालचालीची माहिती घेऊन संभाव्य गुन्हे रोखण्याकरीता कारागृहांनाही "सिक्रेट सर्व्हिस फंड" हा निधी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सिक्रेट सर्व्हिस फंड करीता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व निधीचा विनियोग कशा प्रकारे करण्यात येणार आहे व उक्त मंजूर निधी उपलब्ध होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सन २०१८-१९ साठी रुपये ५,००,०००/- इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला असून, त्यापैकी रुपये ८५,०००/- खर्च करण्यात आला आहे. उक्त निधीचा उपयोग खालील उद्दिष्टांकरीता करण्यात येत असून याबाबत गुप्तता राखण्यात येत आहे.

१) कारागृहात निषिध्द वस्तू नेत असल्याबद्दल/वापरात असल्याबद्दल माहिती मिळविण्यासाठी.
२) बंद्यांचे पलायन, हल्ला, घातपात करावयाच्या कटाची इ. माहिती मिळविण्यासाठी.
३) संचित/अभिवचन रजेवर गेलेल्या व परत कारागृहात विहित कालावधीत हजर न होता फरार असलेल्या बंद्यांची माहिती मिळविण्यासाठी.
४) बंदी/कारागृह कर्मचारी यांच्यातील संबंधातून कारागृह सुरक्षा धोक्यात येऊ नये याबाबतची गुप्त हालचालींची माहिती मिळविण्यासाठी.
५) बंद्यांला न्यायालयात/शासकीय दवाखान्यात नेतांना-आणतांना अन्य टोळीकडून होणाऱ्या संभाव्य हल्याची गुप्त माहिती मिळविण्यासाठी.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई मिल कामगार वसाहतीतील सदनिकांमधील अंतर्गत कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(५) * ४१३९१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घोडपदेव येथील रामभाऊ भोगले मार्गावरील मुंबई मिल कामगार वसाहतीतील सदनिकांमध्ये अनेक अंतर्गत पायाभूत कामे अपुर्णावस्थेत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणी कामगारांनी याबाबत वारंवार तक्रार करून देखील म्हाडा प्रशासन आणि विकासक याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही. म्हाडाच्या अहवालानुसार सदर वसाहतीतील सदनिका गिरणी कामगारांना वितरित करतेवेळी सर्व सुविधा असल्याची खात्री करुनच ताबा देण्यात आले आहे. ताबा देतेवेळी कुठल्याही गिरणी कामगारांची तक्रार म्हाडा कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाबाबत

**(६) * ४१६४२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३४७८७ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्गावरील बी.डी.डी. चाळीचे पुनर्बांधणी करण्याचा निर्णय शासनाने तीन वर्षापूर्वी घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरळी येथील बी.डी.डी. चाळींकरीता विकासकाची नेमणूक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चाळींचा पुनर्विकास करण्यास केव्हापासून सुरुवात होणार आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच विकासक नेमण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केल वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही. दिनांक २१/६/२०१८ रोजी वरळी बी.डी.डी. पुनर्विकास प्रकल्पासाठी बांधकाम कंत्राटदार मे.कपिसिट इन्फ्राप्रोजेक्ट कंपनी लिमिटेड, मे.टाटा प्रोजेक्ट लिमिटेड, मे.सिटीक कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (M/s. Capacite Infraproject Co.Ltd., M/s. TATA Projects Ltd. & M/s. Citic Construction Co.Ltd.) यांना निविदा स्वीकृतीपत्र जारी करण्यात आलेले आहे. सदर बांधकाम कंत्राटदाराने निविदा स्विकृतीपत्रातील अटींचे अनुपालन केल्यानंतर सदर कामांचे कार्यादेश म्हाडाद्वारे जारी करण्यात येणार आहेत.
(४) मे.शापुरजी पालनजी कंपनी यांनी म्हाडाविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र. २०७०/२०१७ व मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द म्हाडाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या फेरविचार याचिका क्र. २८५७०/२०१७ या दोन न्यायालयीन प्रकरणांमुळे तसेच केंद्र शासनाच्या गृह विभागाकडून निविदाकारांना सुरक्षा प्रमाणपत्र मिळण्यास बराचसा कालावधी लागल्याने बांधकाम कंत्राटदाराच्या नियुक्ती प्रक्रियेमध्ये विलंब झालेला आहे.

-----------------

## वांद्रे, मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७) * ४१५९७ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील गैरव्यवहार प्रकरणी सक्त वसुली संचालनालयाने रुपये ६६२ कोटी मुल्याची ३३ घरे जप्त केल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) मिळण्यासाठी विकासकाने बोगस कागदपत्रे सादर करुन इमारत बांधताना नियमांचा भंग केल्याचे तपासात आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) एच-पश्चिम विभाग, वांद्रे (मुंबई) येथील जमात-ए-जमोरीया या झोपडपट्टी पुनर्वसन योजने संदर्भातील संपूर्ण कागदपत्रे सक्त वसूली संचालनालयामार्फत चौकशीसाठी माहे एप्रिल, २०१७ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून मागविण्यात आली आहेत. या कागदपत्रांची सक्त वसूली संचालनालयाच्यास्तरावर छाननी चालू आहे.

(२) सक्त वसुली संचालनालय कार्यालयाकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कोणतेही निर्देश देण्यात आलेले नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत महानगरपालिकेमार्फत गटारावर संरक्षण जाळया बसविण्याबाबत

**(८) * ४२०६३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने गत वर्षी पावसाळ्यात डॉ.दीपक अमरापूरकर उघड्या गटारातून वाहून गेल्याने त्यांचा मृत्यू झाल्यावर सर्व गटारांवर संरक्षक जाळ्या बसविण्याचा निर्णय घेतल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेमार्फत पहिल्या टप्प्यात लाखभर गटारांपैकी केवळ १ हजार ४५० गटारांवर झाकणे बसविण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले असून येत्या पावसाळया अगोदर उर्वरित सर्व ठिकाणी गटारावर जाळ्या बसविल्या गेल्या नाहीत तर नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पावसाळ्या अगोदर मुंबईतील सर्व गटारांवर झाकणे/जाळया बसविण्यासाठी शासनाने महापालिकेला निर्देश देऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईमध्ये सन २०१७ मध्ये झालेल्या पावसाळयात डॉ.दिपक अमरापूरकर यांचा उघड्या गटारातून वाहून गेल्याने त्यांचा मृत्यू झाल्यावर, पूरप्रवण स्थळे व जमिनीखालील मोठ्या आकाराच्या पर्जन्य जलवाहिन्यांच्या मॅनहोलच्या झाकणाच्या आतमध्ये लोखंडी सुरक्षा जाळ्या लावण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे डिसेंबर, २०१७ मध्ये घेण्यात आला आहे.
(२), (३) व (४) मुंबई शहरात पर्जन्य जलवाहिन्यांवर एकूण २८,६७२ मॅनहोल्स आहेत. पूरप्रवण क्षेत्रांमध्ये सदर मॅनहोल्स उघडण्याची शक्यता असल्यामुळे पहिल्या टप्प्यामध्ये अतिधोकादायक अशा १४२५ ठिकाणी लोखंडी सुरक्षा जाळ्या बसविण्यात आल्या आहेत.

कोणत्या ठिकाणी सुरक्षेच्यादृष्टीने जाळ्या बसविणे आवश्यक आहे याबाबत महानगरपालिकेकडून तपासणी करण्यात येत असून मागील कामातील अनुभवावरुन योग्य ते बदल करुन उर्वरित ठिकाणी लोखंडी सुरक्षा जाळ्या बसविण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## पाली (जि.पालघर) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची दूरवस्था झाल्याबाबत

**(९) * ४१९०७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड तसेच वाडा तालुक्यातील पाली येथील औद्योगिक संस्थेची दूरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची स्थिती व दर्जा सुधारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड तसेच वाडा (औद्योगिक प्रशिक्षण संस्था वाडा, पाली येथे कार्यरत आहे) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुस्थितीत चालू आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील भिडे वाड्यात सावित्रीबाई फुले यांच्या नावाने भव्य स्मृतीस्थळ व ऊर्जास्थळ उभारण्याबाबत

**(१०) * ४१५७६ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुधवार पेठ, पुणे येथील भिडे वाड्यात महात्मा ज्योतीराव फुले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या देखरेखीत दिनांक १ जानेवारी, १९४८ रोजी भारतातील पहिली मुलींची शाळा सुरु करुन स्त्री शिक्षणाचा प्रारंभ केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भिडे वाड्याची आजच्या स्थितीत अत्यंत दुरवस्था झाली असून उक्त वास्तूची दुरुस्ती करण्यासाठी अनेक सेवाभावी संस्थांनी व नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदने देवून वाड्याची जागा शासनाने ताब्यात घेण्याबाबत तसेच त्या ठिकाणी सावित्रीबाई फुलेच्या नावाने भव्य स्मृतीस्थळ व ऊर्जास्थळाची उभारणी करण्याबाबतची मागणी दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर वास्तू दुरुस्त करुन सावित्रीबाई फुलेच्या नावाने भव्य स्मृतीस्थळ व ऊर्जास्थळ उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पुणे येथील भिडे वाड्याची दुरूस्ती व तेथे स्मारक करण्याबाबतची मागणी काही संस्था व नागपूर विभागातील शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे.

सदर निवेदन शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त झाले असून पुढील कार्यवाहीसाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडे पाठविले आहे.
(३) पुणे महानगरपालिकेमार्फत भिडेवाड्याची जागा राष्ट्रीय स्मारक करण्यासाठी ठराव मंजूर करण्यात आला आहे.

त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत भूसंपादनाची प्रक्रिया देखील सुरू आहे.

पुणे महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात भिडेवाडा येथे दुरूस्ती करणे व स्मारक उभारणी या प्रयोजनार्थ रुपये १.०९ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

सदर काम प्राधान्याने करण्याबाबत महानगरपालिकेला सूचना देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(११) * ४२६३१ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील शासकीय जमिनीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर शताब्दी वर्षाच्या निमित्ताने स्मारक बांधण्याचा महानगरपालिकेत ठराव घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मारक बांधण्यासाठी शासनाची जमीन आतापर्यंत मनपाकडे हस्तांतरित करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मौजा धंतोली येथील ख.क्र. ५/२, ६ व ७ मधील १३.५६ एकर या महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या शासकीय जागेच्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यासंदर्भात दिनांक ०१/१२/२०१६ व दिनांक ०२/०७/२०१८ रोजी नागपूर महानगरपालिकेने ठराव पारित केलेले आहेत.

(२) सदरहू जागा महानगरपालिकेच्या ताब्यात व वापरात असून, या जागेच्या भाडेपट्टयाच्या नुतनीकरणाचा आवश्यक तो प्रस्ताव जिल्हाधिकारी, नागपूर यांनी महसूल व वन विभागाकडे पाठविलेला आहे. यासंदर्भात महसूल व वन विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) दरम्यान, मा.मुख्यमंत्री महोदय यांनी नागपूर येथे दिनांक ०३/०७/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत, या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शोध केंद्रासाठी व उर्वरित जागेचा एकत्रित आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले होते.

तदनुसार या जागेचा एकत्रित आराखडा तयार करण्याची कार्यवाही महानगरपालिकास्तरावर सुरु आहे.

तद्नंतर जागेच्या वापरानुसार त्यातील फेरबदल करण्यास शासनाची मान्यता घेणेबाबत आवश्यक तो प्रस्ताव सादर करण्याची तयारी सुरु असून, विषयाधीन जागेच्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करणे संदर्भात महानगरपालिकेकडून पाठपुरावा करण्यात येत आहे असे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद आहे.

-----------------

## पुणे शहरातील टेकड्यामधून बोगदा तयार करण्याच्या प्रस्तावास नागरिकांकडून विरोध होत असल्याबाबत

**(१२) * ४२०१२ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या दोन विविध भागांना जोडण्यासाठी टेकड्यांमधून बोगदा तयार करण्याचा प्रस्तावास पुणे महापालिकेने दिलेल्या मंजूरीस शहरातील पर्यावरण प्रेमी व नागरिकाकडून विरोध होत असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर बोगदयास होत असलेल्या विरोधाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पाषाण, पंचवटी ते कोथरूड या भागात होणारी वाहतुक कोंडी कमी करावयाच्यादृष्टीने या भागांना थेट जोडणारा बोगदा/भुयारी मार्गासाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागार नेमण्याची कार्यवाही महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

या मार्गाची दिशा बदलून फेरनियोजन करण्याची मागणी पंचवटी उत्कर्ष सेवा संस्था यांनी महानगरपालिकेकडे केली आहे.

सदर काम अद्याप प्राथमिक स्वरूपात आहे. त्यामुळे या मार्गासाठीची प्रत्यक्ष शक्यता पडताळणी करतेवेळी संबंधितांनी सूचविलेल्या मार्गाबाबत विचार करण्यात येईल असे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (ता.जि.सोलापूर) येथील जमिनीवर भाविकांसाठी असलेल्या विश्रांतीगृहात सोयीसुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१३) * ४१९५३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (ता.जि.सोलापूर) येथे ६५ एकर जमिनीवर भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या विश्रांतीगृहाकडे नगरपालिकेचे दुर्लक्ष होत असून विश्रांतीगृहात सुरक्षा, सोयीसुविधा, स्वच्छता यांचा अभाव असून साहित्याची चोरी देखील होत असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर येथे चैत्री, आषाढी, कार्तिकी, माघ या चार मोठ्या यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांसाठी दिंड्या, पालख्या व राहुटयांच्या वास्तव्याची सोय प्रशासनाने ६५ एकर जागेत केली असून उक्त ठिकाणी भाविकांना गैरसोईचा सामना करावा लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रात दिनांक २८/४/२०१८ रोजी प्रसिद्ध झाले होते. सदर वृत्तात विश्रांतीगृहाच्या सुरक्षेकडे नगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याची बाब प्रामुख्यत: नमूद करण्यात आली होती.

(२) व (३)

- पंढरपूर येथे चैत्री, आषाढी, कार्तिकी, माघ या चार मोठ्या यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या राहुट्यांची/वास्तव्यांची सोय ६५ एकर जागेत करण्यात येते. तेथे आवश्यक सुविधा (रस्ते, पाणी व वीज) नगरपरिषदेकडून उपलब्ध करुन दिल्या जातात.

- या ६५ एकर जागेपैकी साधारणत: ५ एकर जागेत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने विश्रांतीगृह म्हणून २ इमारती बांधल्या असून त्यात शौचालये, स्नानगृहे व विश्रांतीसाठी २ सभागृह आहेत.
- सदर इमारती एप्रिल, २०१८ मध्ये नगरपरिषदेस हस्तांतरीत करण्यात आल्या असून तेव्हापासून सदर इमारतींची देखभाल व दुरुस्ती तसेच सुरक्षा नगरपरिषदेकडून पाहण्यात येते.
- या परिसरातून साहित्याची चोरी झाली नसल्याचे तसेच याबाबतचा कोणताही गुन्हा दाखल झाला नसल्याचे मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर तसेच पोलीस अधीक्षक, सोलापूर (ग्रामीण) यांनी कळविले आहे.
- विश्रांतीगृहाच्या सुरक्षा व देखभालीसाठी नगरपरिषदेकडून २४ तास तीन कर्मचाऱ्यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
- ६५ एकर परिसरात (विश्रांतीगृहासह) आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध असून स्वच्छतेचा अभाव नाही. तसेच ४ मोठ्या यात्रेदरम्यान योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येतो व साध्या वेशातील पोलिसांच्या गस्त २४ तास सुरु असतात, असे पोलीस अधीक्षक, सोलापूर (ग्रामीण) यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळंबोली, नवी मुंबई येथे रस्त्याच्या कामात निकृष्ठ डांबराचा पुरवठा करण्यात आल्याबाबत

**(१४) * ४२१८० आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रस्त्याच्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या डांबराची चोरी आणि त्यामध्ये मार्बलच्या चुऱ्याची भेसळ करणारी टोळी सक्रीय असून ठाणे पोलिसांनी या प्रकरणी एका ट्रकचालकांस अटक केली असल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदारांना डांबराचा पुरवठा करण्याचे काम हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनी लिमिटेड (एचपीसीएल) मार्फत केले जात असून ट्रान्सपोर्ट कंपन्यांच्या वाहनावरील चालक व क्लीनरच्या मदतीने डांबराची चोरी करुन त्यामध्ये मार्बलचा चुरा भेसळ करणारी टोळी नवी मुंबईतील कंळबोली भागात सक्रीय असून या भेसळीमुळे रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या कामांकरीता निविदा शर्तीनुसार कामाकरीता लागणारे डांबर हे कंत्राटदाराकडून रिफायनरीमधुन आणला जातो. सदरील डांबराचे चलन रिफायनरीमधुन उपलब्ध केले जाते. सदरील डांबराचे आवश्यक चाचणी निष्कर्ष घेऊनच डांबर वापरण्याची परवानगी कंत्राटदारास देण्यात येते.

तसेच, डांबराचा पुरवठा करण्याकरीता कुठल्याही ट्रान्सपोर्ट कंपनीला नेमण्यात आलेले नाही किंवा डांबराचा पुरवठा करुन घेतलेला नाही.

(३) डांबर भेसळ केलेला टँकर घेऊन जाणाऱ्या इसमास ठाणे शहर गुन्हे शाखेमार्फत अटक करण्यात आली असून कळवा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२०/२०१८ भा.दं.वि. कलम ३७९, ४०६, ४२०, ३४ अन्वये दिनांक ६./४/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अद्यापपर्यंत एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

तसेच, कळंबोली ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. २०/२०१८ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे. या प्रकरणी २ आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील उच्चभ्रू वसाहतीमध्ये दरोड्याचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१५) * ४१४०७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई, साकीविहार रोडवरील उच्चभ्रू वसाहतीतील बड्या कंपनीत मॅनेजर आणि नामांकित शाळेच्या विश्वस्त असलेल्या महिलेच्या घरात सशस्त्र दरोडा टाकून एकूण साडेचौदा लाखांचा ऐवज लुटल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पवई पोलिसांनी दोघांविरूध्द दरोड्याचा गुन्हा दाखल करून त्याचा तपास सुरू केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तपासानुसार दोन्ही आरोपींना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी पवई पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २०४/२०१८, कलम ३९२, ३४१, ४५२, ५०६(२), ३४ भा.दं.वि. सह कलम ३, २५ शस्त्र अधिनियम, १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदलापूर येथील श्री शारदा केमिकल्स या कारखान्यामधून मेफेड्रॉन (एमडी अंमली पदार्थ) हस्तगत केल्याबाबत

**(१६) * ४१२२५ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर एमआयडीसीतील श्री शारदा केमिकल्स या कारखान्यावर अंबोली पोलीस ठाण्याच्या पथकाने दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास छापा घालून सुमारे सात कोटी रुपये किंमतीचे द्रव्य मेफेड्रॉन (एमडी अंमली पदार्थ) हस्तगत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त छाप्प्यात अटक करण्यात आलेल्या आरोपीची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने चौकशीअंती शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, सदरील घटना दिनांक १४/०४/२०१८ रोजी घडली असून रुपये सात कोटी पन्नास लाख इतक्या किंमतीचे मेफेड्रॉन (एमडी अंमली पदार्थ) जप्त करण्यात आला.

(२) सदरहू गुन्हयात १) शाहीद हुसेन शेर मोहम्मद शाह मु. २० वर्ष. २) नारायणभाई मंगलदास पटेल, ७४ वर्ष यांच्याकडे चौकशी करुन त्यांना सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली.

नमूद गुन्हयांचा तपास पूर्ण करुन दिनांक २३/०६/२०१८ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पेट्रोल पंप गैरव्यवहारातील आरोपींवर कारवाई करण्याबाबत

**(१७) * ४१७३२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यव्यापी पेट्रोल पंपावर डिस्पेन्सिंग युनिटमध्ये पल्सर नामक यंत्र बसवून यंत्रामध्ये फेरफार करुन ग्राहकांना कमी इंधन देणाऱ्या पेट्रोल पंपावर ठाणे पोलीस आयुक्तालय गुन्हे अन्वेषण शाखेने कारवाई करुन उर्वरित ५७ आरोपींचा शोध घेत असल्याबाबतची माहिती माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पेट्रोल पंप गैरव्यवहारातील आरोपींचा तपास पूर्ण होवून त्यांच्यावरील आरोप सिध्द झाला आहे काय तसेच संबंधित पेट्रोल पंप बंद करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली येथे गु.र.क्र. I ३५३/२०१७, भा.दं.वि. कलम २६५, २६७, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ४७३, ३४ सह दि मोटार स्पीड ॲण्ड हाय स्पीड डिझेल ऑर्डर २००५ चे क्लॉज ३, (६) चे उल्लंघन, सह अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील अटक केलेल्या ३३ आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत, सदर गुन्हयात ५७ पाहिजे आरोपी आहेत. दरम्यान, नमूद गुन्हयातील पाहिजे आरोपींनी मा.उच्च न्यायालय, नागपूर व मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिकामध्ये सदर गुन्हयाच्या तपासास व कार्यवाहीस स्थगितीबाबत अंतरिम आदेश दिले आहेत. सदर आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालय येथे विशेष अनुमती याचिका दाखल केली असून अद्याप आदेश व्हावयाचे आहेत.

तसेच, ज्या पेट्रोलपंपाचा तपासणी अभिप्राय (Lab testing report) सकारात्मक आलेला आहे, अशा सदोष पेट्रोलपंपाची माहिती संबंधित पेट्रोलपंप कंपनीस देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय तांत्रिक विदयालये बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(१८) * ४१८४५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव**

**गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक जिल्हा अथवा तालुका मुख्यालयी असलेली शासकीय तांत्रिक विद्यालये बंद करुन त्याऐवजी खाजगी संस्थांना तांत्रिक विद्यालये चालविण्यास परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून या विद्यालयांच्या ताब्यात असणाऱ्या मालमत्तांचा सर्व्हे करण्याचे आदेश विभागीय पातळीवरील शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अशी एकूण ५३ विदयालये असून दरवर्षी ५० ते ६० हजार विदयार्थी या विद्यालयात तांत्रिक शिक्षण घेत असून सदर विदयालयांमध्ये शिकविण्यात येणारा अभ्यासक्रमाची परीक्षा बारावीशी समकक्ष एचएससी बोर्डाच्या माध्यमातून घेण्यात येतात, तसेच या शिक्षणामुळे बहुतांश विदयार्थी वेगवेगळया कारखान्यातून रोजगार मिळवून स्वत:च्या मालकीचा छोटा-मोठा व्यवसाय करित असल्यामुळे सदर शासकीय तांत्रिक विदयालये बंद करण्यात आल्यास ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी तांत्रिक आणि व्यवसायिक स्वरुपाच्या अभ्यासक्रमापासून वंचित राहणार असल्याने बेरोजगारीचे प्रमाण वाढणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर शासकीय तांत्रिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे तसेच उक्त संस्था बंद करण्यात आल्यास हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची पाळी येणार असल्यामुळे या कर्मचाऱ्यांची पर्यायी व्यवस्था कशाप्रकारे करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर तांत्रिक महाविदयालय सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

(२) शासकीय तांत्रिक विद्यालय बंद करण्याचा प्रस्ताव नाही. तथापि, ५३ शासकीय तांत्रिक विद्यालयातील उच्च माध्यमिक व्यवसाय (एचएससी व्होकेशनल) अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (NTC) किंवा राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे प्रमाणपत्र (NCVT) मिळत नाहीत. त्यामुळे उच्च माध्यमिक व्यवसाय (एचएससी व्होकेशनल) अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक बरोबर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे प्रमाणपत्र किंवा राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (NTC) देता यावे या दृष्टीकोनातुन सदर अभ्यासक्रमांचे उन्नतीकरण करुन त्यांचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) किंवा व्यवसाय प्रशिक्षण संस्था (VTI) मध्ये रुपांतरण करणेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी तांत्रिक आणि व्यावसायिक स्वरुपाच्या अभ्यासक्रमांपासून वंचित राहण्याचा आणि बेरोजगारीचे प्रमाण वाढण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) शासकीय तांत्रिक विद्यालये बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नसल्यामुळे कर्मचाऱ्यांवर बेरोजगाराची पाळी येण्याची व त्यांची पर्यायी व्यवस्था करण्याचा प्रश्न उद्भवत नाही

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी येथील म्हाडाच्या वसाहतीच्या पुनर्विकासामध्ये म्हाडाने करारातील अटींचा भंग केल्याबाबत

**(१९) * ४१२४० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डी.एन.नगर, अंधेरी येथील म्हाडाच्या वसाहतीच्या पुनर्विकासामध्ये म्हाडाने करारातील अनेक अटीचा भंग करुन ना हरकत प्रमाणपत्र दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाने ना-हरकत प्रमाणपत्र देण्यापुर्वी महानगरपालिकेने I.O.D. व सी.सी. सदर प्रकल्पास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकाविरुध्द E.O.W. कडे गुन्हा दाखल झालेला असतांनासुध्दा आरोपपत्र दाखल करण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट कागदपत्राच्या आधारे देण्यात आलेली ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) म्हाडाच्या अहवालानुसार हे खरे नाही. पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, मुंबई यांच्या अहवालानुसार डी.एन.नगर, अंधेरी येथील म्हाडाच्या वसाहतीच्या पुनर्विकासामध्ये म्हाडाने करारातील अनेक अटीचा भंग करुन ना हरकत प्रमाणपत्र दिल्याबाबत तपास चालू आहे.

(२) म्हाडाच्या अहवालानुसार दिनांक २०/०५/२०१० रोजी देकारपत्र जारी करण्यात आले आहे. तद्नंतर महानगरपालिकेकडून दिनांक २६/१२/२०११ रोजी I.O.D. देण्यात आले व जोते बांधकाम परवानगी दिनांक ११/०६/२०१२ रोजी देण्यात आली. त्यानंतर दिनांक २२/०८/२०१२ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले.

पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, मुंबई यांच्या अहवालानुसार न्यु डी.एन.नगर को.ऑ.हौ. सोसायटी फेडरेशनच्या दिनांक १६/०६/२००६ च्या प्रस्तावानुसार म्हाडाने दिनांक ०१/०७/२००६ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे व दिनांक २२/०३/२००८ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे.वैदेही आकाश हौ.प्रा.लि. कंपनीला प्लीन्थ पर्यंतची सी.सी. दिलेली आहे. मात्र, कंपनीने प्लीन्थ पर्यंतच्या बांधकामाची परवानगी असतांना त्यापेक्षा अतिरिक्त बांधकाम केले. म्हणून महानगरपालिकेने दिनांक ०३/०२/२०११ रोजी बांधकाम थांबविण्याची नोटीस पाठविली. नोटीस मिळाल्यानंतर युनियनचे सचिव श्री.भुषण सारंग यांनी रिहेबचे बांधकाम केलेल्या ३ मजल्यांच्या ६ इमारती व २ जोथ्या पर्यंतच्या इमारती बेकायदेशीर तोडून टाकले. युनियनचे सचिव यांनी दिनांक २६/०७/२०१० रोजीच्या पत्रान्वये

मे.वैदेही आकाश हौ.प्रा.लि. कंपनी यांचेशी केलेला पुनर्विकास करारनामा रद्द करुन, मे.रुस्तमजी रिअल्टी प्रा.लि. या बांधकाम कंपनीची विकासक म्हणून नेमणूक केली आहे. सदर विकासकाने दिनांक १२/१२/२०११ रोजी सादर केलेल्या सुधारित आराखड्याला मंजूरी व I.O.D. देण्यात आली आहे व दिनांक ११/०६/२०१२ रोजी सी.सी. देण्यात आली आहे.

(३) व (४) आ.गु.वि. गु.नों.क्र. २६/२०१५ या गुन्हयात मे.वैदेही आकाश हौ.प्रा.लि. कंपनीचे संचालक श्री.गुरुनाथ फोंडेकर यांना दिनांक १५/११/२०१६ रोजी अटक करण्यात आली आहे. त्यांचेविरुध्द दोषारोप पत्र सादर केले असून, सदर गुन्हयाचा तपास चालू आहे. याच गुन्हा नोंद क्रमांकामध्ये आरोपी श्री.भुषण सारंग, श्री.दुधाजी शिंदे, श्री.हरेश कुवाडीया, श्री.बोमन इरानी, श्री.कौशिक शहा आणि श्री.चंद्रेश मेहता यांना मा.उच्च न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजूर केला असून, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

आ.गु.वि. गु.नों.क्र. २७/२०१५ मधील आरोपी श्री.भुषण सारंग, श्री.दुधाजी शिंदे, श्री.हरेश कुवाडीया यांनी त्यांच्याविरुध्दातील प्रथम खबरी अहवाल रद्द होण्याकरीता मा.उच्च न्ययालयात क्रिमिनल रिट पिटीशन क्र. २८४२/२०१५ दाखल केला आहे. सदरहू दाव्याची पुढील सुनावणी दिनांक २९/११/२०१८ रोजी असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण जवळील खोणी गावात अनधिकृत स्फोटकांचा साठा जप्त करण्यात आल्याबाबत

**(२०) * ४१६५८ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण जवळील खोणी गावात अनधिकृत स्फोटकांचा मोठा साठा दिनांक १५ एप्रिल, २०१८ रोजी पोलिसांनी जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने किती आरोपींना अटक करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी मानपाडा पोलीस ठाणे येथे गुरनं. ३४/२०१८ भादंविक. २८६,३४ सह भारतीय स्फोटक पदार्थाचा अधिनियम १९०८ मधील कलम ५ व ६ प्रमाणे दिनांक १५/०४/२०१८ रोजी गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्ह्यात १९९ नग जिलेटीन, १०० डिटोनेटर हस्तगत करण्यात आले आहे. या गुन्ह्यात एकूण ३ आरोपींना अटक झाली असून तिन्ही आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मोकळया भूखंडावरील कर कमी करण्याबाबत

**(२१) * ४१३८४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मोकळया भूखंडावरील कर कमी करण्याबाबतचा ठराव क्रमांक १०६ (विषय क्र. १०) दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास महासभेने मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठरावामधील अटीनुसार विकासकांनी त्यांच्याकडील मोकळया भूखंडाची थकीत रकमा भरल्याशिवाय ठरावाची अंमलबजावणी करण्यात येणार नसल्यामुळे दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजीपर्यंत किती विकासकांनी थकीत रकमेचा भरणा महानगरपालिकेकडे केला आहे,

(३) असल्यास, तत्कालिन आयुक्त (श्री.पी वेलरासू) यांनी सन २०१७-१८ पर्यंतच्या सर्व थकीत रकमांपैकी ५० टक्के रक्कम (रुपये २०८.७५ कोटी) महापलिकेच्या तिजोरीत जमा झाल्याशिवाय शासनाकडे प्रस्ताव पाठविला जाणार नाही असे लेखी पत्र कर निर्धारक व संकलन यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार तत्कालिन आयुक्तांच्या पत्रावर व महासभेने मंजूर केलेल्या ठरावावर त्यांची भूमिका काय आहे तसेच सदर ठरावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील नियम लागू होतात काय याबाबत चौकशी केली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) सदर ठरावात पुढील अटी व शर्तीचा समावेश आहे.

१) सन २०१७-१८ पर्यंतच्या थकीत रकमेपैकी किमान ५०% रक्कम महापालिकेत जमा झाल्याशिवाय शासनाकडे प्रस्ताव पाठविला जाणार नाही.

२) सन २०१७-१८ पर्यंतच्या थकीत कराची रक्कम अथवा त्यावरील व्याज माफ केले जाणार नाही.

३) सदरची योजना शासन मंजूरीनंतर दिनांक ०१/०४/२०१८ पासून लागू केली जाईल.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील जमिनीवरील कराचे माहे डिसेंबर, २०१७ अखेर एकूण मागणी ४१९ कोटी होती, त्यापैकी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील दिनांक ३१ मार्च, २०१८ अखेर मोकळ्या भूखंडावरील कराची रक्कम रुपये ९५.४८ कोटी वसूल केली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर ठरावातील अटींची पुर्तता न झाल्याने ठरावाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

सर्वसाधारण सभेने पारीत केलेला ठराव व तत्कालिन आयुक्त यांचे निर्देश विचारात घेऊन सन २०१८-१९ ची कराची बिले सन २०१७-१८ चे प्रचलित पध्दतीने निर्गमित करण्यात आलेली आहेत, असे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील महानगरपालिका रुग्णालयांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२२) * ४२४३५ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील महानगरपालिका रुग्णालयात अनेक यंत्रणा कार्यरत नसून तंत्रज्ञ नसणे, अतिदक्षता विभाग नसणे, निष्क्रिय व अपुरे मनुष्यबळ तसेच प्रसुतीसाठी पुरेसी साधनसामुग्री उपलब्ध नसल्यामुळे रुग्णालयांची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नूसार सदर रुग्णालयांचा दर्जा सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)

- पुणे महानगरपालिकेचे १ सर्वसाधारण रूग्णालय, १ सांसर्गिक आजाराचे रूग्णालय, १७ प्रसुतिगृहे, ४६ बाह्यरूग्ण विभाग कार्यरत आहेत.
- महापालिकेच्या विविध रूग्णालयात आरोग्य सेवेचा दररोज सुमारे ६ हजार बाह्यरूग्ण व सुमारे २०० आंतररूग्णांना लाभ होतो.
- महापालिकेच्या प्रसूतीगृहात आवश्यक सर्व सामुग्री उपलब्ध असून १५ ते १६ हजार गरोदर माता या सर्व रूग्णालयामधून मोफत तपासण्या व औषध उपचाराचा लाभ घेतात असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
- तथापि, पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू सर्वसाधारण रूग्णालयातील अतिदक्षता विभाग पूर्णत: कार्यरत नसल्याची बाब खरी आहे.
- अतिदक्षता विभागासाठी आवश्यक असणारी सर्व अद्‌यावत साधनसामुग्री रूग्णालयात उपलब्ध झाली आहे. तथापि, मानकानुसार आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याचा महानगरपालिकेमार्फत प्रयत्न चालू आहे.

- नियमित मनुष्यबळ उपलब्ध होईपर्यंत शासनाकडील बंधपत्रित तज्ञ डॉक्टर्स, खाजगी प्रक्रियेव्दारे तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध करून घेण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे.
- सदर अतिदक्षता विभागातील हृदयरोग विषयक अतिदक्षता विभाग, महानगरपालिका व खाजगी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने कार्यरत करण्यात आला असून त्याव्दारे ४०० ॲन्जोओग्राफी व ३०० ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रीया यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत.
- महानगरपालिकेच्या या सर्व सुविधा सर्वसामान्य रूग्णांना परवडतील अशा अल्पदराने उपलब्ध आहेत असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
- तसेच पुणे महानगरपालिकेसाठी नामनिर्देशनाने भरण्याचे प्रस्तावित असणारी आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे प्राधान्याने भरण्याच्यादृष्टीने नियमित विहित प्रक्रियेव्दारे निवड झालेल्या उमेदवारांना त्वरित नियुक्ती आदेश देण्याबाबत शासनाकडून पुणे महानगरपालिकेस सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरीवली (पूर्व), मुंबई येथील दौलतनगर येथे दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत

**(२३) * ४२३२० श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (पूर्व), मुंबई येथील दौलतनगर रोड क्र. ३ जैन मंदिर जवळ जलवाहिनीतून गत काही दिवसापासून दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भागात दूषित पाण्याचा पुरवठा होण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने तपासणी केली आहे काय, तपासात काय आढळून आले व त्यानुसार सदर भागातील नागरिकांचा शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बोरीवली (पूर्व) येथील दौलतनगर रोड क्रमांक ३ व ७ या परिसरात दूषित पाणी पुरवठ्याची तक्रार दिनांक २२/०३/२०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली होती.
(२) दूषित पाणीपुरवठ्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर या भागातील जलवितरण वाहिन्यांमधील गळती शोधण्यासाठी जलवाहिन्यांची जाळे तपासणी करण्यात आली.

सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांद्वारे जलवाहिन्यांचे अंतर्गत निरिक्षण केल्यानंतर आढळून आलेल्या गळत्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत या परिसरात दूषित पाणीपुरवठा बंद झाला असून पिण्यायोग्य पाणीपुरवठा होत असल्याचे तसेच सदर परिसर निरिक्षणाखाली ठेवला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) खाडी किनारी झालेली अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(२४) * ४१३५३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) खाडी किनाऱ्यावरील कांदळवनाची कत्तल करून त्याठिकाणी अनधिकृत बांधकामे होत असल्याने त्यावर कारवाई करण्याबाबतचे पत्र तहसिलदार, कल्याण यांनी बंदर निरीक्षक, कल्याण रेती बंदर व आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास देऊन त्या पत्राची एक प्रत जिल्हाधिकारी, ठाणे व उपविभागीय अधिकारी, कल्याण यांनाही प्रतिलिपीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकामांजवळ मेरिटाईम बोर्डाचे कार्यालय असून, मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाच्या अधिकाऱ्यांनी या अनधिकृत बांधकामांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने ही अनधिकृत

बांधकामे करण्यात येत असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते कौस्तुभ गोखले यांनी मेरिटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाचे सदस्य सचिव व जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे दिनांक १५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकामांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या सर्व संबंधित दोषींवर तसेच कांदळवनाची कत्तल करून सी.आर.झेड. नियमांचे उल्लंघन करून करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. तथापि, कल्याण खाडी किनारी झालेल्या अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत तहसिलदार, कल्याण यांनी दिनांक ०१/०१/२०१८ रोजी पत्र दिले आहे.

(२) व (३) सदर क्षेत्र बंदर हद्दीत नाही. तथापि, श्री.गोखले यांनी केलेली तक्रार ही गोविंदवाडी बायपास खाडी किनारी बाधित झालेल्या जागेवरील अनधिकृत बांधकाम व जनावरांच्या गोठ्याबाबत आहे. सदरचे बांधकाम बंदर हद्दी क्षेत्राबाहेरील असल्यामुळे ते निष्कासित करण्याबाबत बंदर अधिकारी यांनी दिनांक २१/०६/२०१८ च्या पत्रान्वये आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही.

-----------------

## लोहार चाळ, माहिम येथील शिवप्रसाद या इमारतीमधील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(२५) * ४१९१५ ॲड.राहुल नार्वेकर** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहिम परिसरातील लोहार चाळ येथील शिवप्रसाद या धोकादायक इमारतीमध्ये सातशे फुटाचे अनधिकृत बांधकाम केल्याचे माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी इमारत मालकाने मा.मुख्यमंत्री यांचेकडे सदर अनधिकृत बांधकाम निष्कसित करण्याबाबत निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) लोहार चाळ, माहिम येथील शिवप्रसाद या इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम झाले असल्याबाबतची तक्रार शासनास प्राप्त झाली होती.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या स्थळ निरिक्षणादरम्यान याठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे आढळून आले होते.

यास्तव मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४अ अन्वये दिनांक ०३/०५/२०१८ रोजी सदर अनधिकृत बांधकामास नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीशीविरोधात पक्षकाराने मा.नगर दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता. सदर दावा मा.न्यायालयाने दिनांक १५/०६/२०१८ रोजी निकाली काढला आहे.

यानुषंगाने दिनांक ०३/०७/२०१८ व दिनांक ०९/०७/२०१८ रोजी महानगरपालिकेमार्फत निष्कासन प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, अतिपावसामुळे निष्कासन कारवाई करता आली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील कारखान्यांच्या सुरक्षिततेबाबत

**(२६) * ४२०८३ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील** : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील विविध भागात शेकडो कारखाने असून या कंपनीमध्ये काम करणा-ऱ्या कामगारांची व परिसरातील भागाच्या सुरक्षिततेबाबत कारखान्यांकडून शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केले जात नसुन येथील ढेकू औद्योगिक वसाहतीतील एका ऑईल कंपनीला दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एखादा प्लांट उभारताना सुरक्षिततेच्यादृष्टीने किती संरक्षक भिंतीपासून जागा सोडणे तसेच प्लांटमध्ये अपघातवेळी बाहेर जाण्यासाठी सुरक्षित मार्ग असावा याबाबत कुठलेही नियम सदर कंपनीकडून पाळले गेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ढेकू येथे आग लागलेल्या ऑईल कंपनीबाबत अनेकदा तक्रारी परिसरातील कंपनीतील अधिकाऱ्यांनी संबंधित शासकीय विभागाकडे करूनही त्याकडे शासकीय यंत्रणेकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर** : (१) व (२) ढेकू औद्योगिक वसाहतीतील एका ऑईल कंपनीला दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी आग लागली होती. तथापि, कारखान्यांकडून सुरक्षिततेच्या नियमांचे पालन केले होते किंवा कसे याची सखोल तपासणी करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील घाटकोपर, बर्वेनगर येथील महानगरपालिकेची शाळा बंद करण्यात आल्याबाबत

**(२७) * ४१८२३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर बर्वेनगर येथील सन १९६३ साली सुरु करण्यात आलेली मुंबई महानगरपालिकेची शाळा क्रमांक ३ विदयार्थी पटसंख्या शुन्यावर आल्यामुळे बंद करण्यात आल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेच्या आवारातच बंद झालेल्या इंग्लिश माध्यमाचे वर्ग एका खाजगी शाळेला भाडेतत्वावर देण्यात आल्यामुळे महापालिकेच्या शाळेची पटसंख्या शुन्यावर आली असून मराठी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आल्याने याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) घाटकोपर, बर्वेनगर येथील महानगरपालिकेच्या शालेय इमारतीमधील शाळा क्र. ३ ची पटसंख्या ५६ झाल्यामुळे व एकाच इमारतीमध्ये मराठी माध्यमाच्या २ शाळा असल्यामुळे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये शाळा क्र. ३ चे विलिनीकरण शाळा क्र. ४ मध्ये करण्यात आले आहे.

(२) सदर शालेय इमारतीमध्ये असणारी महानगरपालिकेची इंग्रजी माध्यमाची शाळा बंद झालेली नसून ती याच इमारतीतील शाळा क्रमांक ३ च्या वर्गखोल्यामध्ये स्थलांतरीत करण्यात आली असून, सद्य:स्थितीत इयत्ता १ ली ते ७ वी चे २२४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सदर शाळेच्या आवारातील अन्य बैठ्या इमारतीमधील रिक्त खोल्या स्वामी शामानंद या खाजगी अनुदानित शाळेला अनुज्ञा-नि-अनुज्ञापन तत्वावर सन १९९४ साली देण्यात आल्या असून, सदर वर्गखोल्यांमध्ये स्वामी शामानंद या संस्थेची मराठी माध्यमाची शाळा भरत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरात वृक्ष तोड केली जात असल्याबाबत

**(२८) * ४१९९३ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील विकास अंतर्गत एका वर्षात पाच लाख झाडांचा विविध कारणांमुळे बळी गेला असल्याची बाब दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरेगांव येथील आरे कॉलनी व आसपासच्या परिसरात झाडांवर विष प्रयोग करुन बळी घेतला जात असल्याची बाब ही निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार विष प्रयोग करुन झाडांचा बळी घेणाऱ्यावर कडक कारवाई करुन पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्याबाबत कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाचे वृत्त दिनांक २०/०४/२०१८ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.

तथापि, मुंबई शहर व उपनगरातील विकास अंतर्गत एका वर्षात तब्बल पाच लाख झाडांचा विविध कारणांमुळे बळी गेला ही बाब खरी नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) आरे दुग्ध वसाहतीमध्ये झाडांच्या खोडाला छिद्र करुन रसायनसदृश्य पदार्थ टाकले असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांचे कार्यालयामार्फत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------------

## मीरा-भाईदर महापालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत रुग्णालयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत

**(२९) * ४१५२७ श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत सन २०१२ पासून रुग्णालयात कंत्राटावर कार्यरत असलेल्या परिचारिका व बहुउद्देशीय अशा एकूण ७२ कर्मचाऱ्यांना मुदतवाढ न मिळाल्याने त्यांना माहे फेब्रुवारी पासूनचे वेतन आस्थापना विभागाकडून अदा करण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार उक्त कर्मचाऱ्यांना वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाच कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)

- मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या वैद्‌यकीय आरोग्य विभागात भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रूग्णालय, स्व.इंदिरा गांधी रूग्णालय व इतर आरोग्य केंद्रामध्ये वैद्‌यकीय आरोग्य अधिकारी, परिसेविका, अधिपरिचारीका, शस्त्रक्रिया परिचर, बहुउद्देशिय कर्मचारी अशा एकूण ७२ कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावर नियुक्ती केलेली आहे.
- सदर अधिकारी/कर्मचारी यांची दिनांक ११/०१/२०१८, दिनांक १७/०२/२०१८ व दिनांक ०३/०२/२०१८ अशा तीन टप्प्यांमध्ये मुदत संपुष्टात आली होती.
- उक्त अधिकारी/कर्मचारी यांची मुदत संपुष्टात आल्याच्या दिनांकानंतर १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढे ६ महिन्यासाठी नवीनिकरणाचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला असता स्थायी समितीने सदर प्रस्तावास दिनांक २७/०४/२०१८ रोजी मंजूरी दिली.

- त्यास अनुसरून सदर कर्मचाऱ्यांचे माहे फेब्रुवारी, २०१८ पासूनचे वेतन दिनांक १०/०५/२०१८ रोजी अदा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद-बीड बायपास रस्त्यावरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(३०) * ४२५७० श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-बीड बायपास रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्यामुळे या रस्त्यावर अपघात होऊन जिवितहानी होण्याचे प्रमाण वाढत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रस्त्यावरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)

- औरंगाबाद-बीड बायपास रस्त्यावर अतिक्रमणामुळे अपघात होवून जिवितहानी होण्याचे प्रमाण वाढत आहे, अशी वस्तुस्थिती नाही.
- तथापि, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील औरंगाबाद-बीड बायपास रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या सर्विस रस्त्याच्या बाजूस अनधिकृत बांधकामे झालेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
- सदर अनधिकृत बांधकामांबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६० व कलम ४७८(२) अन्वये एकूण १३४ अतिक्रमणधारकांवर महानगरपालिकेमार्फत नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत.

- सदर नोटीशींच्या अनुषंगाने अतिक्रमणधारकांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे एकूण २५ याचिका दाखल केल्या.
- मा.उच्च न्यायालयाने महानगरपालिकेच्या नोटीशींना स्थगिती दिली व प्रकरणनिहाय सुनावणी घेऊन निर्णय घेण्याबाबत महानगरपालिकेस निर्देश दिलेले आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिकेकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
- मा.न्यायालयाच्या आदेशामुळे सद्य:स्थितीत एकही अतिक्रमण निष्कासित करण्यात आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिडकोने खारघर येथील स्वप्नपूर्ती गृहप्रकल्पातील घरांच्या किंमतीत वाढ केल्याबाबत

**(३१) * ४२५४५ श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने खारघर येथील स्वप्नपूर्ती गृहप्रकल्पातील सुमारे तीन हजार तीनशे चौतीस घरांच्या विक्रीसाठी सन २०१४ च्या सुमारास सोडत काढली असून अडीच वर्ष प्रतिक्षा यादीत असलेल्या ग्राहकांना घरांच्या किंमतीत सिडकोने सात ते दहा लाखांची वाढ केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वप्नपूर्ती गृहप्रकल्पातील ग्राहक तसेच प्रतिक्षा यादीतील ग्राहकांना चालू आर्थिक वर्षातील बाजारभावाप्रमाणे घरांचे दर आकारण्यात आले असून दराची भरणा करणेसाठी महिनाभराची मुदत दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गृहप्रकल्पातील घरांच्या किंमतीत वाढ करण्याची कारणे काय आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने प्रतिक्षा यादीतील ग्राहकांच्या सवलतीसाठी शासनस्तरावरुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सिडको महामंडळाने सेक्टर ३६, खारघर, नवी मुंबई येथे अल्प उत्पन्न गटासाठी २४५० व अत्यल्प उत्पन्न गटासाठी ७०४ एवढ्या सदनिकांसाठी संगणकीय सोडतीद्वारे स्वप्नपूर्ती गृहनिर्माण योजना राबविली होती. सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता सदनिकांच्या दरात वाढ करण्यात येते. या सुधारित प्रचलित धोरणानुसार प्रत्येक आर्थिक वर्षाच्या दरांनुसार सदनिकांची किंमत आकारण्यात येणार असल्याबाबत नोंद घेण्याविषयी प्रतिक्षा यादीमधील अर्जदारांना अवगत करण्यात आले आहे.

सदर धोरणानुसार या सोडतीच्या प्रतिक्षा यादीवरील दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत नोंदणी शुल्काच्या अनामत रकमेचा भरणा सिडकोकडे केलेल्या अर्जदारांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या दराप्रमाणे, दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत अनामत रकमेचा भरणा केलेल्या अर्जदारांना सन २०१७-१८ या वर्षाच्या दराप्रमाणे, तसेच चालू आर्थिक वर्षात अनामत रकमेचा भरणा करणाऱ्या अर्जदारांना सन २०१८-१९ या वर्षाच्या दरानुसार रकमेचा भरणा करणे अनिवार्य आहे.

तसेच सदनिकेच्या किंमतीचा भरणा करण्याकरीता अर्जदारांना प्रचलित धोरणानुसार ६ महिन्यांची मुदत देण्यात आलेली आहे. या निश्चित केलेल्या आर्थिक वर्षनिहाय दरानुसारच सिडकोकडून रकमेचा भरणा करून घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमळनेर (जि.जळगांव) येथील पोलीस स्टेशनमधील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३२) * ४३८४२ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगांव) येथील पोलीस स्टेशनमध्ये कर्मचारी संख्या अपूर्ण असून मंजूर पोलीस कर्मचारी संख्या १०२ असतांना केवळ ५५ कर्मचारी कार्यरत असल्याचे निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी पोलीस स्टेशनचे विभाजन करून ग्रामीण व शहर पोलीस स्टेशनची निर्मिती करण्याबाबतचा प्रस्तावही शासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर पोलीस स्टेशनमधील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच ग्रामीण व शहर पोलीस स्टेशन निर्मितीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अमळनेर पोलीस स्टेशनमध्ये पोलीस कर्मचारी मंजूर संख्या ९८ असून सर्वसाधारण बदल्या २०१८ मध्ये अमळनेर पोलीस स्टेशन येथे कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या असून, त्यानुषंगाने अमळनेर पोलीस स्टेशन येथे हजर संख्याबळ ७६ झालेले आहे.

तथापि, अमळनेर हे संवेदनशिल पोलीस स्टेशन असल्याने तेथे वेळोवेळी आवश्यकतेनुसार प्रशासनाची निकड लक्षात घेऊन ३० पोलीस कर्मचाऱ्यांचे दंगा नियंत्रण पथक (आरसीपी पथक) पुरविण्यात येते.
(२) व (३) अमळनेर पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन अमळनेर पोलीस ठाणे निर्माण करणे दुसऱ्या टप्प्यामध्ये प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुही (जि.नागपूर) ग्रामपंचायतींतर्गत पाणीपुरवठा योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * ४२५३४ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुही (जि.नागपूर) ग्रामपंचायतींतर्गत सन २०१४-१५ या वर्षात वाढीव पाणीपुरवठा योजनेत २७१ लक्ष निधी मंजूर झाले असून त्या निधींपैकी रुपये २४ लक्ष बांधकाम केलेल्या पाणीपुरवठा विहिरीवर परत खोलीकरणाच्या नावाखाली माहे एप्रिल, २०१५ मध्ये नगरपंचायतीने निविदा काढली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झालेल्या कामावरच खोलीकरणाच्या नावाखाली रुपये ६० लक्ष कामाची निविदा काढण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) कुही नगरपंचायत दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी अस्तित्वात आली. त्याआधी कुही ग्रामपंचायतीस भोरदेव नाला येथील साधारण: ३०-३५ वर्ष जुन्या विहिरीवरुन पाणीपुरवठा करण्यात येत होता.

जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा यंत्रणेमार्फत तेथे नवीन दुसरी विहिर बांधण्याचे तसेच नवीन जलवाहिन्या, पाण्याची टाकी व इतर अनुषंगिक कामे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात आली. या कामांची रुपये २,७१,३६,४०८/- एवढ्या किंमतीची निविदा दिनांक १६ जून, २०१४ रोजी मंजूर करण्यात आली. यापैकी विहिर बांधकामाची रक्कम रुपये २३,८८,१०४/- एवढी होती. हे काम दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी पूर्ण करुन डिसेंबर, २०१७ मध्ये ही विहीर जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने नगरपंचायतीला हस्तांतरीत केली.

३०-३५ वर्षे जुन्या विहिरीची दुरुस्ती आवश्यक ठरल्याने त्या विहिरीवरुन होणारा पाणीपुरवठा नवीन बांधण्यात आलेल्या विहिरीवरुन होण्याच्यादृष्टीने नवीन विहिरीची खोली ६.५० मीटरने वाढविण्याचे प्रस्तावित करण्यात आले. त्यानुसार सदर खोली वाढविण्याचे काम, जुन्या विहिरीच्या दुरुस्तीचे काम व इतर अनुषंगिक कामे यांची एकत्रित निविदा दिनांक ६/३/२०१८ रोजी नगरपरिषदेने प्रसिध्द केली. सदर निविदेची रक्कम रुपये ६६,३९,६३८/- एवढी होती. सदर काम निविदा रक्कमेच्या ०.९९% कमी दराने श्री.आर्य कन्स्ट्रक्शन यांना दिनांक १०/४/२०१८ रोजी मंजूर करण्यात आले.

नवीन विहिरीच्या कामावर रुपये ११,६१,७७२/- एवढा खर्च नगरपरिषदेने केला असून प्रत्यक्षात ४.३० मीटर एवढी खोली वाढविण्यात आली आहे. आजमितीस कुही शहरास पूर्णत: नवीन विहिरीवरुन पाणीपुरवठा केला जात असून जुन्या विहिरीच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा फुले मंडईच्या (क्रॉफर्ड मार्केट) नुतनीकरणाच्या कंत्राटाबाबत

**(३४) * ४१८९१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले मंडईच्या (क्रॉफर्ड मार्केट) नुतनीकरणासाठी रुपये २२८ कोटी खर्च येणार असून सदर नुतनीकरणाचे कंत्राट बाजारभावापेक्षा तिप्पट दर आकारणाऱ्या कंत्राटदारास देण्यात आल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंत्राटदारामार्फत प्रती चौरस फूट बांधकामासाठी रुपये दहा हजार खर्च आकारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) "नुतनीकरणासाठी तिप्पट खर्च" अशा आशयाचे वृत्त वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.
(२) महात्मा ज्योतिबा फुले मंडई ही वारसा जतन तालिकेवरील संरचनात्मक वास्तु असून, सदर मंडईची दुरुस्ती व नुतनीकरण दोन टप्प्यांमध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर मंडईच्या नुतनीकरणाकरीता बांधकाम अंदाजपत्रक किंमतीनुसार रुपये ४४८८ प्रति चौ.फुट तर कंत्राटदाराने भरलेल्या अधिक ८.७५ टक्केवारीसह बांधकाम खर्च रुपये ४८८० प्रति चौ.फुट इतका आहे. त्यामुळे कंत्राटदारामार्फत प्रती चौ.फूट बांधकामासाठी सुमारे रुपये दहा हजार खर्च आकारण्यात आला आहे हे खरे नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहर पोलीस आयुक्तालय हद्दीतून मुली बेपत्ता होत असल्याबाबत

**(३५) * ४१२४८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरामधून मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले असून माहे जानेवारी, २०१८ पासून ते दिनांक १ मे, २०१८ पर्यंत शहरातून बेपत्ता झालेल्या ५४ मुलींमध्ये अल्पवयीन मुलींची संख्या अधिक आहे, तसेच माहे एप्रिल महिन्यात २५ तारखेपर्यंत ३० मुली व गत तीन वर्षात तब्बल ४०५ मुली बेपत्ता झाल्याची नोंद शहरातील विविध पोलीस ठाण्यामध्ये झाली असून केवळ २१ दिवसात २५ मुली शहरातून बेपत्ता झाल्याचे दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी गत ५ वर्षात साडेसात हजार नागरीक बेपत्ता झाले असून त्यातील ६४३१ जणांना पोलिसांनी शोधून परत आणले असले तरी ११०० जणांचा शोध लागलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नैराश्य, एकटेपणा, न्यूनगंड अशा कारणांबरोबरच प्रेम प्रकरणातून मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण अधिक असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याच्या पार्श्वभुमीवर मुली बेपत्ता होण्याचे प्रकारास आळा घालण्याच्या अनुषंगाने कोणती विशेष उपाययोजना, जनजागृती शासनाकडून करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाशिक शहरात दिनांक ०१/०१/२०१८ ते दिनांक ०१/०५/२०१८ या कालावधीत एकूण ८४ मुली बेपत्ता झाल्या होत्या. त्यापैकी ७१ मुलींचा शोध घेण्यात आलेला आहे. दिनांक ०१/०४/२०१८ ते दिनांक २५/०४/२०१८ या कालावधीत एकूण २५ मुली बेपत्ता झाल्या होत्या, त्यापैकी २२ मुलींचा शोध घेण्यात आला आहे. तसेच, गत ३ वर्षात एकूण ४०५ मुली बेपत्ता झाल्या होत्या, त्यापैकी ३८६ मुली मिळून आल्या आहेत.

(२) सन २०१३ ते सन २०१७ या कालावधीतील बेपत्ता नागरिकांची संख्या ६७२७ इतकी असून त्यापैकी ५९२० नागरिकांचा शोध लागला आहे.

(३) सदर घटनांच्या चौकशीमध्ये जास्तीत-जास्त मुली या १५ ते १८ वयोगटातील असून त्यापैकी जास्त प्रमाण हे प्रेमसंबधातून पळून गेल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी भा.दं.वि.कलम ३६३ अन्वये गुन्हे दाखल करुन मिळून आलेल्या मुलींचे समुपदेशन करुन त्यांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

हरवलेल्या/पळविलेल्या मुलांचा/मुलींचा शोध घेण्याकरीता पोलीस आयुक्तालय, नाशिक स्तरावर महिला सुरक्षा विशेष शाखे अंतर्गत शाळा, कॉलेज, मुली व मुलांची वसतिगृह अशा ठिकाणी समुपदेशन व संरक्षणाचे कार्यक्रम घेण्यात येतात. या प्रकरणी पोलीस महासंचालक कार्यालयाने दिनांक १५/११/२०१४ रोजी प्रमाण कार्यपध्दती (SOP) निर्गमित केली असून त्या अन्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही केली जाते. तसेच प्रत्येक हरवलेले/अपहरण झालेल्यांची माहिती CCTNS प्रणालीमध्ये 'खोया बचपन' व 'ट्रॅक दि मिसींग चाईल्ड' या वेब पोर्टल वर भरली जाते. तसेच ऑपरेशन मुस्कान १, २, ३ ऑपरेशन स्माईल अशा प्रकारच्या शोध मोहिमा राबवून हरवलेल्या बालकांचा शोध घेण्यात येतो. याकरीता नाशिक शहरात सर्व पोलीस स्टेशनमध्ये मिसींग कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

हरविलेल्या व्यक्तींचा, स्वत:चा, नातेवाईकांचा, मित्रांचा मोबाइल क्र. यांचे सी.डी.आर. काढून त्यावरून आरोपीतांचा तसेच पिडीताचा त्वरीत शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील एन.आर.आय.पोलीस ठाण्यात लाच घेताना महिला पोलीस हवालदाराला अटक झाल्याबाबत

**(३६) * ४२७६० श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील एन.आर.आय.पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात तडजोड करण्यासाठी एका महिला पोलीस हवालदाराला रुपये ३५ हजाराची लाच स्वीकारताना लाचलुचपत अधिकाऱ्यांनी अटक केल्याची घटना माहे मे, २०१८ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाच मागणाऱ्या महिला पोलीस हवालदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

आरोपी लोकसेविका पुष्पा कृष्णाजी देशमुख, पोलीस हवालदार यांनी तक्रारदार यांचेविरुध्द दाखल गुन्ह्यामध्ये अधिक कलम न वाढविण्याकरीता रुपये ३५०००/- एवढ्या रकमेच्या लाचेची मागणी केली व त्यापैकी रुपये १५०००/- एवढी लाच स्विकारताना त्यांना पकडण्यात आले. त्याबाबत आरोपी लोकसेविका यांचेविरुध्द एन.आर.आय.पोलीस ठाणे गु.र.क्र. ११५/२०१८ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी आरोपी लोकसेविका पुष्पा कृष्णाजी देशमुख, पोलीस हवालदार यांना निलंबित करण्यात आले आहे.

-----------------

## मुंबईतील मोनो रेल्वे सेवा सुरु करण्याबाबत

**(३७) * ४३०११ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मोनो रेल्वेच्या कामास विलंब लागत असल्यामुळे मुळ खर्चात २३६ कोटी रुपयांची वाढ झाली असून माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मोनो रेल्वेच्या मैसूर कॉलनी स्थानकाजवळ लागलेल्या आगीनंतर मोनो रेल्वे सेवा बंद असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत तसेच बंद पडलेली मोनो रेल्वे सेवा प्रवाशांच्या सोयीसाठी केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मोनो रेल प्रकल्पाच्या निविदा रक्कमेमध्ये वाढ झालेली नाही. दिनांक ०९/११/२०१७ रोजी म्हैसूर कॉलनी स्थानकाजवळ एका मोनो रेलला लागलेल्या आगीच्या दुर्घटनेनंतर मोनोरेल सेवा बंद आहे.

मोनो रेलला आग लागल्याच्या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र चौकशी समिती गठीत केली असून परिचालन व देखभाल करणारे कंत्राटदार व सल्लागार यांच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडला असल्याचा अहवाल समितीने सादर केला आहे.

निवृत्त रेल्वे सुरक्षा आयुक्त यांनी शिफारशीमध्ये सुचविल्याप्रमाणे आपत्कालीन परिस्थितीमध्ये प्रवाशांची सुखरुप सुटका करणे, बचाव कार्य आणि अपघात मदत उपाययोजना यांचा प्राधिकरण सल्लागारामार्फत अभ्यास

सुरु आहे. अशा प्रकारे अपघात झाल्यास व प्रवासी अडकल्यास त्यांची सुटका करण्यासाठी वॉक वे (Walk way) बांधण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्यास्तरावर नियोजित आहे.

मोनो रेल प्रकल्पाचा टप्पा-१ हा एका महिन्याच्या आत सुरु करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्यास्तरावर नियोजित आहे.

-----------------

## मुंबई शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत

**(३८) * ४२१६९ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात प्रतिदिनी निर्माण होणाऱ्या सुमारे ६५० मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सन २००७ मध्ये नेमलेल्या महालक्ष्मी येथील हायड्रोलिक ऑपरेटेड मेकॅनाइज्ड केंद्राच्या कंत्राटाचा कालावधी दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास संपुष्टात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महापालिकेच्या चौकशीत दोषी ठरलेल्या ठेकेदारांनाच कचरा उचलण्याच्या कामांचा ठेका देण्यात येत असल्याचेही माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून उक्त दोषी कंत्राटदारांना पुन्हा कामे देण्याची कारणे काय, तसेच महानगरपालिकेने कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासाठी नवीन कंत्राटदाराची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया करुन नवीन कंत्राटदाराची नियुक्ती केली आहे काय,

(३) असल्यास, मुंबई येथील कचरा उचलण्यासाठी एकूण किती व कोणकोणत्या कंत्राटदारांच्या निविदा प्राप्त झाल्या, तसेच प्राप्त निविदापैकी कमीत कमी दराची व जास्तीत जास्त दराची निविदा कोणाची होती, नवीन कंत्राटदार नियुक्त करण्याच्या दरम्यानच्या कालावधीत कचरा उचलण्याचे कंत्राट कोणत्या कंपनीला किती रक्कमेला देण्यात आले आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेल्या चौकशीमध्ये दोषी ठरलेल्या कंत्राटदारांना कंत्राट देण्यात आले नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी कंत्राटदार व त्यांचा देकार खालीलप्रमाणे आहेत:-

| कालावधी | कंत्राटदार | देकार (रुपये प्रति मे.टन) |
|---|---|---|
| २०१७-१८ | १) मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेन्ट सेल प्रा.लि. | २८७.०० |
| | २) मे.ध्रुव इन्फ्रास्ट्रक्चर | ४३६.०० |
| २०१८-१९ | १) मे.कवीराज वेस्ट मॅनेजमेन्ट प्रा.लि. | २७८.१० |
| | २) मे.भवानी ट्रेडर्स | २७९.०० |

सन २०१७-१८ या कालावधीकरीता मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेन्ट सेल प्रा.लि. यांना व सन २०१८-१९ या कालावधीकरीता मे.कवीराज वेस्ट मॅनेजमेन्ट प्रा.लि. यांना कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे कंत्राट देण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईमधील बेस्ट प्रवासी संख्या कमी झाल्याबाबत

**(३९) * ४२०६८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक ४०१४८ ला दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील बेस्ट उपक्रमामधील जादा भाडेवाढ, फेऱ्यांची कमी झालेली संख्या, तिकीट मशीन मधील बिघाड अशा वेगवेगळ्या कारणांनी बेस्ट प्रवाशांची संख्या दोन लाखांनी घटली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्टची प्रवासी संख्या गत सात वर्षात ४० टक्क्यांनी घटली असून मागील काही वर्षात बेस्टमार्फत देण्यात येणाऱ्या सोईसुविधेमध्ये सुधारणा न झाल्याने बहुतांश प्रवासी खाजगी पर्यायाचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेस्टमधील प्रवासी संख्या वाढविण्याबरोबरच स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी बेस्टचे आधुनिकीकरण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) काही प्रमाणात झालेली भाडेवाढ, पर्यायी प्रवासी वाहने व खाजगी वाहने यांच्या संख्येत झालेली वाढ यामुळे बेस्ट उपक्रमाच्या प्रवाशी संख्येमध्ये घट झालेली आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापी, तिकीट मशीन बिघाडामुळे प्रवाशांची संख्येत घट झाली, हे खरे नाही.

(२) मुंबई शहरातील प्रवाशांची वाढलेली क्रयशक्ती तसेच प्रवासाच्या अन्य माध्यमांमध्ये झालेल्या वाढ यामुळे बेस्ट प्रवाशांची संख्या घटली आहे ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) बेस्ट आधुनिकीकरण व प्रवाशांचा बसप्रवास सुखकारक होण्याकरीता खालील उपाययोजना प्रस्तावित आहे. :-

- बस ताफ्यात आकाराने लहान असलेल्या मिनी-वातानुकूलीत बसगाड्यांचा समावेश भाडेतत्वावर करण्यात येणार आहे.

- अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने इंटेलिजेंट ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टिमच्या सहाय्याने उपक्रमाच्या कामांमध्ये सुधारणा करण्याकरीता सर्व कार्यांचे संगणकीकरण करण्यात येणार आहे.
- मुंबईतील सामाईक प्रवासाकरीता मुंबई ट्रॅव्हल कार्ड (MTC) व प्रवाशांना माहिती देण्याकरीता प्रवासी माहिती पध्दती (P.I.S.) आदी अत्याधुनिक सुविधा देखील प्रवाशांना पुरविण्यात येणार आहेत.
- तिकीट वितरणाकरीता ETIM मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

-----------------

## नागपूर शहरातून लहान मुले बेपत्ता होत असल्याबाबत

**(४०) * ४३२९६ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातून लहान मुले बेपत्ता होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून माहे जानेवारी ते मार्च, २०१८ या कालावधीत ६३ मुले रहस्यमयरीत्या बेपत्ता झाली आहेत, गत वर्षी १२९ मुले रहस्यमयरीत्या बेपत्ता झाले असून माहे जानेवारी, २०१८ पासून आजतागायत कळमना पोलीस स्टेशनांतर्गत २७, जरीपटका पोलीस स्टेशनांतर्गत १४ व नंदनवन पोलीस स्टेशनांतर्गत १३ तर हुडकेश्वर पोलीस स्टेशनांतर्गत ८ मुले बेपत्ता झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुले बेपत्ता होण्याचे मुख्य कारण आई-वडील रागावणे, अभ्यासाचा तणाव, प्रेमप्रकरण, ईच्छा पूर्ण न होणे, परीक्षेत अनुत्तीर्ण होण्याची भीती, आमिष दाखवून पळवून नेणे इत्यादी असू शकत असल्यामुळे उक्त कारणांवर आळा बसण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, नागपूर शहरातून लहान मुले बेपत्ता होण्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| कालावधी | बेपत्ता मुले | | मिळून आलेली मुले | |
|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली |
| सन २०१७ | १५६ | ३२३ | १४४ | ३०३ |
| जाने ते मार्च, २०१८ | ४५ | ९४ | ४१ | ७७ |

जानेवारी ते मार्च २०१८ पावेतो पोलीस स्टेशन कळमना, जरीपटका, नंदनवन, हुडकेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत बेपत्ता मुलांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| पोलीस स्टेशन | बेपत्ता | | मिळून आलेली | |
|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली |
| कळमना | ०८ | २२ | ०८ | १८ |
| जरिपटका | ०३ | ११ | ०३ | ०७ |
| नंदनवन | ०६ | ०७ | ०६ | ०६ |
| हुडकेश्वर | ०२ | ०४ | ०२ | ०४ |

(२) मुले बेपत्ता होऊ नये अशा प्रकारास आळा घालणे कामी नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात आल्या.

१. सामाजिक सुरक्षाशाखा आणि सायबरशाखा नागपूर शहराकडून शहरात शाळा / महाविद्यालये येथे जागरुकता कार्यक्रम घेण्यात आले आहे. त्यामध्ये कोणत्याही अमिषाला बळी न पडणेबाबत सविस्तर कळविण्यात येते.

२. मोहल्ला समिती / नागरिक सभेव्दारे पोलीस स्टेशन हद्दीत बीटनिहाय बैठक घेण्यात येते. त्यामध्ये पालकांना मुला मुलींचे काळजी घेण्याबाबत, लहान मुला मुलींवर लक्ष ठेवणेबाबत शाळेत जाताना / येतांना ओळखीचे रिक्षा मध्येच पाठविणेबाबत, शाळेच्या अधिकृत वाहनामध्येच पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे आणि जनजागृती करण्यात आली आहे.

३. एकंदरीत मुले बेपत्ता प्रकारास आळा घालण्याबाबत पोलीस पेट्रोलिंगदरम्यान विशेष लक्ष पुरविण्यात येत आहे. दामिनी पथकाकडून (महिला पथक) शाळा, शैक्षणिक संस्थेबाहेर पेट्रोलिंग होत आहेत. बडी कॉप्स (Buddy Cops) योजनेमार्फत वसतिगृह ठिकाणी जागरुकता करणे सुरु आहे.

(३) अल्पवयीन बेपत्ता मुले शोध घेण्याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. www.trackhemissingchild.gov.in या वेब साईटवर बेपत्ता मुला-मुलीची माहीती अपलोड करण्यात येते.
२. बेपत्ता मुला-मुलींची माहीती सोशल मिडीयावर प्रसारीत करण्यात येते.
३. सायबर सेलच्या माध्यमातून बेपत्ता मुला-मुलींचा शोध घेण्यात येतो.
४. दुरदर्शन व आकाशवाणीच्या माध्यमातून माहिती प्रसारीत करण्यात येते.
५. संपूर्ण देशात बेपत्ता मुला-मुलींबाबत बिनतारी संदेशाद्‍वारे माहिती प्रसारीत करण्यात येते.
६. बेपत्ता मुला-मुलींच्या शोधकामी गर्दीच्या ठिकाणी शोधपत्रिका लावण्यात येतात. हरवलेल्या मुलाच्या शोधाकरीता पोलीस स्टेशनस्तरावर पथक तयार करून विशेष मोहीम राबविण्यात येते.
७. राज्यात १८ वर्षाखालील हरवलेल्या बालकांच्या बाबतीत माहिती प्राप्त झाल्यानंतर त्याची त्वरीत दखल घेऊन अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच हरवलेल्या मुलासंबंधी तपासाचा कालावधी ४ महीन्यापेक्षा अधिक झाला असेल व बालक शोधण्यास यश मिळत नसेल तर असे गुन्हे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडे पुढील तपासकामी वर्ग करण्यात यावे असे आदेश गृह विभागाकडून देण्यात आले आहेत.
८. सायबर तक्रार निवारण C-३ केंद्र, भरोसा सेल, BUDDY COPS, CYBER SAFETY इत्यादी उपक्रम सुरू केले आहेत.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातून वाहणाऱ्या मुळा-मुठा नदीपात्रातील पाणी स्वच्छ करण्याबाबत

**(४१) * ४२०२९ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातून वाहणाऱ्या मुळा-मुठा नदीमध्ये शहरातील सांडपाणी विनाप्रक्रिया सोडले जात असून काही नाल्यातील पाणी थेट नदीत जात असल्याने नदीपात्रातील पाणी दूषित झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदीपात्राच्या दोन्ही बाजूच्या परिसरात असलेल्या आयटी कंपन्यांसह इतर सोसायटयांमधून दररोज दूषित पाणी मुळा-मुठा नदीत सोडले जाते तसेच वडगांव शेरी, खराडी, मुंढवा केशवनगर परिसरातून कपडे, वाहने, भांडी धुण्यासाठी केमिकलचे साबण, पावडर व शॅम्पोचा वापर केला जातो तसेच ओला व सुका कचरा नदीपात्रात फेकला जात असल्याने देखील नदी पात्रातील पाणी दूषित होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मुळा-मुठा नदीमध्ये सांडपाणी प्रक्रिया करुन सोडण्याबाबत तसेच नदी पात्रातील पाणी स्वच्छ करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतून वाहणाऱ्या मुळा-मुठा नद्यांचा उगम महानगरपालिका हद्दीबाहेरील क्षेत्रात आहे.

पुणे महानगरपालिका हद्दीतून व काही प्रमाणात हद्दीबाहेरील नदी काठच्या गावांमधून सांडपाणी नदीत मिसळून नदीपात्रातील पाणी दूषित होते ही वस्तुस्थिती आहे.

पुणे महानगरपालिका हद्दीत ७४४ दशलक्ष लि.प्रतिदिन इतके सांडपाणी निर्माण होते. ५६७ दशलक्ष लीटर प्रतिदिन क्षमतेची सांडपाणी शुध्दीकरण केंद्रे महानगरपालिकामार्फत उभारण्यात आली आहेत.

(३) सन २०२७ पर्यंतची लोकसंख्या गृहीत धरून शहरातून निर्माण होणारे संपूर्ण सांडपाणी नदीमध्ये प्रक्रिया करून सोडण्याच्यादृष्टीने केंद्र शासनाने राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत मुळा-मुठा नदीचे प्रदूषण नियंत्रण करणे या ९९०.२६ कोटी इतक्या रकमेच्या प्रकल्पास मंजूरी दिलेली आहे.

सदर योजनेत पुणे शहरात सुमारे ११३.६ कि.मी. मलवाहिन्या टाकण्यात येणार असून एकूण ३९६ दशलक्ष लीटर प्रतिदिन क्षमतेची नविन ११ मैलापाणी शुध्दीकरण केंद्र बांधण्यात येणार आहेत. सदर बाबतची निविदा प्रक्रिया चालू असून सदर प्रकल्प सुमारे २०२२ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात क्षयरोगाच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(४२) * ४२३४८ आर्कि.अनंत गाडगीळ, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये इमारतींच्या पुनर्विकासासह अनेक नवीन विकास प्रकल्प जोरात सुरु असल्याने तसेच शहरातील वाढत्या झोपडपट्ट्यांचे प्रमाण पाहता प्रदूषणाच्या पातळीमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने मुंबईत क्षयरोग रुग्णांची संख्या ४५ हजारावर पोहचली असल्याचे दिनांक २४ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन व मुंबई महानगरपालिकेमार्फत क्षयरोगावर नियंत्रण आणण्यासाठी तसेच क्षयरोगग्रस्तांना रोगमुक्त करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत व गेल्या ३ वर्षात केलेल्या उपाययोजनेमुळे क्षयरोग नियंत्रणात ठेवण्याचे उद्दिष्ट साध्य झाले आहे काय,

(३) असल्यास, काही औषधांना दाद न देणाऱ्या (एमडीआर) क्षयरोगाचे ४८९१ रुग्ण नव्याने आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने क्षयरोग नियंत्रणात आणण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीत मुंबईत ४५,००० क्षयरुग्णांची नोंद झाली आहे ही वस्तुस्थिती आहे.

क्षयरोग हा हवेमार्फत पसरत असल्याने, मुंबई शहरातील वाढती लोकसंख्या, गर्दी, दाट वस्ती आणि घरामधील खेळत्या हवेचा अभाव इत्यादींमुळे क्षयरुग्णांची वाढ झाली आहे.

तथापि, औषधोपचारांना रुग्णाकडून मिळणारा प्रतिसाद, रुग्णाची प्रतिकार शक्ती, त्याच्या पौष्टिक आहाराचा दर्जा व औषधे नियमित व वेळेवर घेणे यावर देखील क्षयरोगाची वाढ अवलंबून असते.

(२) क्षयरोगावर नियंत्रण आणण्यासाठी व क्षयरोगग्रस्तांना रोगमुक्त करण्यासाठी मागील ३ वर्षांत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालील सुविधा झपाटयाने राबविल्या जात आहेत :-

- निदान सुविधा
- उपचार, एम.डी.आर. (Multi Drug Resistant) उपचार
- समुपदेशन व आहार
- प्रसार प्रतिबंधक उपाययोजना
- जनजागृती

सदर सुविधांमुळे जास्तीत जास्त क्षयरुग्णांना लवकरात लवकर शोधून काढून उपचारावर आणणे हे क्षयरोग नियंत्रणाचे पहिले उद्दिष्ट शक्य झाले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) एम.डी.आर. निदान केंद्रांमध्ये वाढ झाल्यामुळे जास्तीत जास्त एम.डी.आर. रुग्णांचे वेळेवर निदान शक्य झाले आहे.

सन २०१७ मध्ये सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (RNTCP) अंतर्गत तसेच, खाजगी रुग्णयालयातील ४८९१ क्षयरुग्णांची नोंदणी करुन त्यांना योग्य व अद्ययावत उपचार प्रणालीद्वारे उपचार देण्यात येत आहेत.

केंद्र शासनामार्फत प्रत्येक जिल्हा व शहराचे एमडीआर स्थितीचा वारंवार आढावा घेऊन नवीन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतात व त्यानुसार मुंबईमध्ये खालील सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्यात येते :-

- युनिव्हर्सल डीएसटी (Drug Sensitivity Test)
- नवीन औषधे (बीडाक्युलीन)
- डीएसटी मार्गदर्शक उपचार पध्दती
- अल्पकालीन उपचार पध्दती (Short Regimen MDR Treatment)

उपरोक्त सर्व अद्ययावत एमडीआर उपचार तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुर्ला (पूर्व), मुंबई येथील पालिका मंडईच्या जागेवर प्रसूतीगृह अथवा रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(४३) * ४१६३५ श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला (पूर्व) येथे निता डेव्हलपर्स या विकासकाने झोपु योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये मंडईसाठी राखीव ठेवलेल्या जागेवर पालिकेने गत पाच वर्षापासून मंडई सुरू केली नसल्याची बाब दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी पालिकेने देखभालीसाठी एकही सुरक्षारक्षक ठेवलेला नसल्याने रात्रीच्या वेळी काही समाज कंठक असामाजिक कृत्य करीत असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरात मोठ्या प्रमाणात बाजारपेठ असल्याने मंडईची आवश्यकता नसून त्याऐवजी याठिकाणी एखादे प्रसूतीगृह अथवा रुग्णालय सुरु करण्यात यावे अशी मागणी रहिवाशांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर ठिकाणी मंडई ऐवजी प्रसूतीगृह अथवा रुग्णालय सुरु करण्याकरीता शासन महापालिकेला निर्देश देणार काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : (१) कुर्ला (पूर्व), मुंबई येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीत समायोजन आरक्षणांतर्गत विकासकाने मंडई बांधून बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक ०६/०९/२०१३ रोजी हस्तांतरीत केली आहे.

सदर मंडईमध्ये १८ प्रकल्पबाधित व्यक्तींना कायमस्वरुपी पर्यायी जागा व चेंबूर येथील भाऊराव हरिश्चंद्र चेंबूरकर या धोकादायक मंडईतील ९५ अनुज्ञापत्रधारकांना तात्पुरत्या स्वरुपात जागा वितरित करण्यात आली आहे.

या ठिकाणी ३ गाळेधारकांनी गाळे ताब्यात घेतले असून, मंडई सुरु झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. तथापि, आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करुन तसेच दोष दूर करुन सदर मंडई लवकरात लवकर सुरु करण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.
(२) समायोजन आरक्षणांतर्गत महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या मंडईमध्ये प्रकल्पबाधितांच्या असोसिएशनमार्फत सुरक्षारक्षकांची तजवीज करणे आवश्यक आहे.

तथापि, सदर ठिकाणी पूर्णवेळ सुरक्षारक्षक तैनात करण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.
(३), (४) व (५) सदर ठिकाणी महानगरपालिकेच्या किरकोळ मंडईचे आरक्षण आहे. त्यामुळे इमारतीचा वापर बदलता येत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा, मुंबई येथील पोलीस निरीक्षकाच्या मुलाचा मृतदेह आरे वसाहतीत आढळून आल्याबाबत

**(४४) * ४३१९९ श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा विभागातील पोलीस निरीक्षक श्री.नरेंद्र शिंदे यांचा मुलगा अथर्व याचा मृतदेह दिनांक ९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास सकाळी आरे वसाहतीत आढळून आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आरे पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला आहे काय, तपासात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मयत मुलाचा मृतदेह दिनांक ०९ मे, २०१८ रोजी आरे वसाहतीत आढळून आलेला नसून त्याचा मृतदेह बंगला नंबर ३१ च्या पाठीमागे, तलावाच्या शेजारी, रॉयल पामस, आरे कॉलनी गोरेगाव पूर्व, मुंबई येथे मिळून आलेला आहे. सदरबाबत आरे पो. ठाणे येथे गु.र.क्र. ११६/१८ कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तद्नंतर सदरचा गुन्हा दिनांक १७/५/२०१८ रोजी पुढील तपासाकरीता गुन्हे अन्वेषण विभाग, कांदिवली पश्चिम, मुंबई या कक्षाकडे वर्ग करण्यात आला असून दिनांक १८/५/२०१८ रोजी गु.र.क्र. ३०/१८ अन्वये नोंद घेऊन गुन्हा तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# विलेपार्ले, कुर्ला व घाटकोपर (मुंबई) येथील इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४५) * ४२८७२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रुझ विमानतळ येथील हवाई वाहतूक व्यवस्थेच्या परिसरातील इमारतींच्या उंचीवरील निर्बंधामुळे पूर्ण एफएसआय वापरता येत नसल्याने विलेपार्ले, कुर्ला आणि घाटकोपर परिसरातील सुमारे ६ हजार पेक्षा जास्त इमारतींचे पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय विमानतळ प्राधिकरणाने विमानतळाच्या आजूबाजूच्या परिसरातील प्रलंबित इमारतींच्या पुनर्विकासाबाबत आपली भूमिका स्पष्ट करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त परिसरातील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची सदय:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) ते (३) मुंबईतील सांताक्रुझ विमानतळ येथील हवाई वाहतुक व्यवस्थेच्या परिसरातील इमारतीच्या उंचीवरील निर्बंधामुळे काही जागांवर पूर्ण एफएसआय वापरता येत नाही हे खरे आहे.

बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ सह विकास नियंत्रण नियमावली-२०३४ शासनाने मंजूरी दिली असून सदर नियमावलीमध्ये विनियम ४५ हे ठराविक क्षेत्रात विकासास उंचीचे बंधन यासंबंधी असून त्यामधील तरतूद ४५(जी) चे खालील टिप्पणीमध्ये यासंबंधी तरतूद प्रस्तावित आहे. तथापि, याबाबतची सर्व माहिती व वस्तुस्थिती लक्षात घेऊन याबाबत स्वतंत्र धोरण ठरविण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## मौजे एक्सर, बोरीवली (मुंबई) येथील भूखंडाचे संपादन करण्याबाबत

**(४६) * ४१७७८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे एक्सर, बोरीवली (मुंबई) येथील सिटी सर्व्हे नं. ८२८, ८५७, ८६७ या भूखंडाच्या संपादनाची प्रक्रिया रुग्णालय, प्रसूतीगृह व दवाखाना या सार्वजनिक प्रयोजनासाठी दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी वा त्यासुमारास सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महानगरपालिका विभागात रुग्णालय, प्रसूतीगृह व दवाखान्याची कोणतीही सुविधा उपलब्ध नसतानाही मालक व प्रशासनातील संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने सदर भूखंडाचे संपादन रद्द करण्याच्या दिशेने प्रक्रिया राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनतेसाठी निर्माण होणाऱ्या अत्यावश्यक सुविधांची निकड लक्षात घेता सदर भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संपादन प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त भूसंपादन प्रक्रिया रद्द करण्याची व स्थगित करण्याची कारणे काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर विभागाच्या पुनर्रचित विकास आराखडा, १९९१ नुसार मौजे एक्सर न.भू.क्र. ८२८, ८५७, ८६७ हा भूखंड उद्यान, रुग्णालय, प्रसूतीगृह, दवाखाना व १३.४० मी. रुंद विकास नियोजित रस्ता याकरीता आरक्षित आहे.

सदर भूखंड निवासी क्षेत्रात स्थित असून, सदर भूखंडांवरील मंजूर पुनर्रचित विकास आराखडा १९९१ मधील आरक्षणे दिनांक ८ मे, २०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार मुंबईचा विकास आराखडा-२०३४ मध्ये कायम ठेवण्यात आली आहेत.

सदर भूखंडावरील आरक्षणाबाबत मे.निशल्प रिअ‍ॅल्टीज प्रा.लि. यांनी दिनांक २७/१२/२०१० रोजी खरेदी सूचना बजावली होती. त्यानुसार सुधार समितीच्या दिनांक १७/१०/२०११ व महानगरपालिकेच्या दिनांक २३/१२/२०११ रोजीच्या ठरावानुसार सदर प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली असून, सदर प्रस्ताव दिनांक १७/११/२०११ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सादर करण्यात आला.

सदर भूसंपादनाखालील जमीन संपादित करण्याकरीता कलम ६ ची अधिसूचना दिनांक २३/१२/२०११ रोजी शासकीय राजपत्रात प्रकाशित झाली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर भूसंपादन प्रक्रिया रद्द वा स्थगित करण्यात आलेली नसून, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने नगर भूमापन अधिकारी यांनी संयुक्त मोजणी दिनांक २६/०७/२०१८ रोजी ठेवली आहे.

(५) सदर भूसंपादन प्रक्रियेत झालेल्या विलंबाची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

- सदर भूखंडाचे क्षेत्र अंदाजे ३२,३८५.७० चौ. मी. असून भूखंड पूर्णत: भारग्रस्त आहे.
- स्थानिक रहिवाशांच्या विरोधामुळे दिनांक ०२/०५/२०१७ रोजी ठेवण्यात आलेली संयुक्त मोजणी दुसऱ्याच दिवशी रद्द करण्यात आली.
- प्रथम संयुक्त मोजणी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्राबाहेरील कारणास्तव स्थगित झाल्यामुळे नव्याने संयुक्त मोजणीसाठी आकारण्यात आलेले रुपये ८३,२५०/- इतके पुनर्भेट मोजणी शुल्क आकारण्यात येऊ नये अशी विनंती प्रधान सचिव, महसूल यांना करण्यात आली होती.
- तद्नंतर खरेदी सूचना बजावलेल्या जमीन मालकाने पुनर्भेट मोजणी शुल्क भरण्यास तयारी दर्शविली आहे.

-----------------

## मुंबई शहरामध्ये गर्भनिरोधक शस्त्रक्रियेच्या वेळी महिलांचा मृत्यू झाल्याबाबत

**(४७) * ४१२९२ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये कुटुंब नियोजनासाठी केल्या जाणाऱ्या गर्भनिरोधक शस्त्रक्रियेमुळे मागील ५ वर्षात २४ महिलांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत्यू पावलेल्या महिलांच्या वारसदारांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली आहे,

(३) तसेच, गर्भनिरोधक शस्त्रक्रिया केल्यानंतर पुरुष अथवा स्त्रियांना शासनाकडून प्रोत्साहन म्हणून प्रत्येकी किती रक्कम दिली जाते व त्यामध्ये वाढ करण्याचेदृष्टीने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मृत्यू पावलेल्या महिलांच्या वारसदारांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच गर्भनिरोधक शस्त्रक्रिया केल्यानंतर पुरुष अथवा स्त्रियांना प्रोत्साहन म्हणून दिल्या जाणाऱ्या रक्कमेत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई शहरामध्ये कुटुंब नियोजनासाठी केल्या जाणाऱ्या गर्भनिरोधक शस्त्रक्रियेमुळे गेल्या ५ वर्षांत २४ महिलांचा मृत्यू झाला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर मृत्यू पावलेल्या महिलांच्या वारसदारांना मागील ५ वर्षांमध्ये खालीलप्रमाणे आर्थिक मदत देण्यात आली आहे :-

| सन | आर्थिक मदतीची रक्कम |
|---|---|
| २०१३-१४ | रुपये १०.५० लाख |
| २०१४-१५ | --- |
| २०१५-१६ | रुपये ६.५० लाख |
| २०१६-१७ | रुपये ६ लाख |
| २०१७-१८ | रुपये ४ लाख |

स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया केल्यानंतर राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रोत्साहन म्हणून दारिद्रयरेषेखालील/अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील स्त्री लाभार्थींसाठी रुपये ६००/- व दारिद्रयरेषेवरील महिलांसाठी रुपये २५०/- इतकी रक्कम देण्यात येते.

तसेच, बिनटाका पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केल्यानंतर पुरुष लाभार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून रुपये १४५१/- इतकी रक्कम देण्यात येते.

(४) व (५) कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेमुळे/त्यादरम्यान होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केली/करण्यात येत आहे:-

- सन २०१० पासून मुंबईसाठी जिल्हास्तरीय गुणवत्ता अभिवचन समिती (District Quality Assurance Committee) ची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत प्रत्येक कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया मृत्यू प्रकरणाची विस्तृत चौकशी करण्यात येते.
- कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करताना सर्व शासकीय व निमशासकीय संस्थांच्या सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी मार्गदर्शक सूचना, शासकीय परिपत्रके सर्व संबंधित रुग्णालयांना देण्यात आली आहेत.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे कर निर्धारक व संकलक यांना बडतर्फ करण्याबाबत

**(४८) * ४१४८० ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक ३७८९३ ला दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे तत्कालिन कर निर्धारक व संकलक श्री.अनिल लाड यांना तीन दिवसांत अहवाल प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिका सेवेतून बडतर्फ करण्यात येईल असे आश्वासन मा.सभापती महोदयांनी विधानपरिषदेत दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्वासनाची पूर्तता करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने तत्कालिन कर निर्धारक व संकलक श्री.अनिल लाड यांच्यासंदर्भातील अहवाल पाठविण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस लेखी आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून उक्त प्रकरणी अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्याचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे व त्यानुसार तत्कालिन कर निर्धारक व संकलक श्री.अनिल लाड यांना बडतर्फ करण्याची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) श्री.अनिल लाड, तत्कालिन कर निर्धारक व संकलक (सद्या निलंबित) यांनी त्यांच्या कार्यकाळात १९ मिळकत धारकांना मालमत्ता कराची संपूर्ण वसुली न करताच ना-हरकत दाखले दिल्याच्या विषयाबाबत विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ३७८९३ च्या दिनांक २८/०३/२०१८ रोजीच्या सभागृहातील चर्चेदरम्यान मा.सभापती महोदयांनी "मंत्री महोदयांनी कर आयुक्तांना तीन दिवसात अहवाल देण्यास सांगितले आहे. तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर ते कार्यवाही करतील, पुढील अधिवेशनाच्या आत ते बडतर्फ होतील असे पहावे" असे निर्देश दिले आहेत.

(२) सदर प्रकरणी शासनाने दिनांक २०/०२/२०१८ च्या पत्रान्वये तर दिनांक २१/०३/२०१८, दिनांक ०४/०४/२०१८ व दिनांक १५/०५/२०१८ च्या शासन स्मरण पत्रान्वये आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे.

(३)

- आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून अद्यापही अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यांचेस्तरावर कार्यवाही सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
- आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.
- श्री.अनिल लाड हे दोन खाजगी कंपनीवर संचालक असल्याबाबत सन २०१७ च्या हिवाळी अधिवेशनातील लक्षवेधीच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनाचे अनुषंगाने श्री.लाड यांना महानगरपालिकेने निलंबित केले आहे.
- सदर प्रकरणाच्या विभागीय चौकशीत श्री.लाड हे दोषी असल्याचे सिध्द झाले आहे.
- त्यानुषंगाने श्री.लाड यांना गंभीर शिक्षा देणेबाबतचा प्रस्ताव कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने सर्वसाधारण सभेकडे सादर केलेला आहे.
- सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार पुढील आवश्यक कारवाई करण्यात येईल, असे महानगरपालिकेने त्यांचे अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात राबविण्यात आलेल्या पब्लिक बायसिकल शेअरिंग योजनेबाबत

**(४९) * ४२६०३ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेकडून पब्लिक बायसिकल शेयरिंग योजना राबविण्यात आली असून प्रशासनाने पुणे शहराचा सर्वे न करता परस्पर पार्किंगसाठी जागा निश्चित करुन त्याठिकाणी दुचाकी व चारचाकी वाहने तसेच, सायकल ट्रॅकची कनेक्टिव्हिटी नसल्याने सायकल कोणत्या ठिकाणी लावली जाईल याबाबत कोणतीही उपाययोजना नसल्याची बाब माहे मे, २०१८ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)

- पुणे महानगरपालिकेमार्फत पुणे शहरात एकात्मिक सायकल आराखडा तयार करण्यात आला असून पब्लिक बायसिकल शेयरिंग योजना राबविण्यात येत आहे.
- हा आराखडा तयार करताना महानगरपालिकेने खाजगी संस्थेव्दारे शहरात व्यापक सर्वेक्षण केले असून त्यामध्ये घरगुती सर्वेक्षण, रस्त्याचे परिक्षण, पार्किंग जागांचे सर्वेक्षण, पायाभूत सुविधा व वाहन मोजणी, तसेच ऑनलाईन सर्वेक्षण केले आहे. सदर आराखड्यास महानगरपालिकेने मान्यता दिलेली आहे.
- सदर मंजूर आराखड्यानुसार संपूर्ण शहरात सायकल ट्रॅक विकसित करण्यासाठी नेटवर्क नकाशे करून संपूर्ण ट्रॅकची संलग्नता (कनेक्टीव्हिटी) निश्चित केली आहे.
- या योजनेंतर्गत भाडेतत्वावर उपलब्ध करून दिलेल्या सायकल्स तसेच नागरीकांच्या स्वमालकीच्या सायकल्स पार्किंग करण्यासाठी शहरात विविध ठिकाणी ७९८ पार्किंग स्टेशन्स प्रस्तावित असून त्यापैकी १५२ दाट वस्तीत आहेत.
- सदर पार्किंगच्या जागा देखील नागरीकांची मागणी, वाहतुकीच्या ठिकाणी यांचा विचार करून तज्ञ संस्थेमार्फत केलेल्या सर्वेक्षणानुसारच निश्चित करण्यात आल्या आहेत असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
- एकात्मिक सायकल आराखड्यानुसार प्रत्यक्ष अंमलबजावणीस सुरूवात झाली असून पुढील २ वर्षांत संपूर्ण आराखडा कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महापालिकेमध्ये खाजगी सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याबाबत

**(५०) * ४२३२३ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेमध्ये सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली असतानाही महापालिकेच्या रुग्णालयात, शाळांमध्ये, विविध विभागात स्वच्छता करण्याकरीता खाजगी सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन त्यावर कोटयवधी रुपयांचा खर्च करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महापालिकेमार्फत सफाई कंत्राट मर्जीतील महत्वाच्या कंत्राटदाराला देण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सफाईचे काम कंत्राटी पध्दतीने न देता पिटी केस अंतर्गत सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) "पालिका रुग्णालयात खाजगी सफाई कर्मचारी" अशा आशयाचे वृत्त वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.

- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये रिक्त असणाऱ्या सफाई कामगारांची पदे, सदर पदांवर नियमित कर्मचाऱ्यांची नियुक्ती होईपर्यंत तात्पुरत्या तत्वावर नोंदणीकृत सेवाभावी संस्थांमार्फत विभाग पातळीवर भरण्यात येतात.
- उपनगरीय रुग्णालयांपैकी कांदिवली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वसाधारण रुग्णालयात सफाई कामगारांची पदे बाहयस्त्रोतीकरणाद्वारे अशासकीय संस्थेमार्फत भरण्यात आली आहेत.

  उर्वरित उपनगरीय रुग्णालयांमध्ये सफाईचे काम रुग्णालयांच्या आस्थापनेवरील सफाई कामगारांमार्फत करण्यात येतात.

- के.ई.एम., नायर व सायन या प्रमुख रुग्णालयांतील नियमित सफाई कामगार, रोजंदारीवरील कामगार व रुग्णालयाचे क्षेत्रफळ याचा आढावा घेऊन सफाईची सेवा बाह्यस्त्रोतीकरणाद्वारे करण्यासाठी सन २०१७-१८ मध्ये निविदा प्रक्रियेद्वारे लघुत्तम निविदाकारास स्थायी समितीच्या मंजुरीने कंत्राट देण्यात आले आहे.
- मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नियुक्त करण्यात आलेल्या मा.न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीनुसार सन २००९ पासून बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांच्या इमारतींची स्वच्छता, विद्युत साधने/उपकरणे यांची स्वच्छता व सुरक्षा याकरीता ई-निविदा प्रकियेद्वारे बाह्य कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात येते.

(२) सफाई कंत्राट महानगरपालिकेमार्फत मर्जीतील महत्वाच्या कंत्राटदारांना देण्यात येत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार महानगरपालिकेमार्फत सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व पात्रतेनुसार अनुकंपा/अग्रहक्क/वारसाहक्क तत्वावर नोकरी देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सर्वसमावेशक आरक्षणाखालील सदनिका विनावापर असल्याबाबत

**(५१) * ४१५०३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपलिका क्षेत्रात सुमारे ४०० सदनिकांचे अधिकृतपणे वाटप झालेले नसल्याने त्या विनावापर असून अनेक ठिकाणी विकासकांनी भाड्याने वापरण्यास दिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वसमावेशक आरक्षणामुळे इमारत उभारताना विकासकांना त्यातील काही सदनिका १० टक्के कोट्यात राखीव ठेवणे शासकीय नियमानुसार बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सदनिकांचे तातडीने वितरण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये सर्वसमावेक्षक आरक्षणाचे धर्तीवर प्रदान करण्यात आलेल्या बांधकाम परवानगींमधून ७३ सदनिका महापालिकेस प्राप्त झाल्या, ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे आहे.
(३) उपरोक्त प्राप्त ७३ सदनिकांपैकी ३४ सदनिकांचा वापर सुरू आहे. उर्वरित ३९ सदनिकाचा वापर करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकास्तरावर करण्यात येत असल्याचे महापालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील भुलेश्वर येथील अनधिकृत सुवर्ण व्यवसाय अन्यत्र स्थलांतरीत करण्याबाबत

**(५२) * ४३१६६ ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भुलेश्वर परिसरातील अनधिकृत सुवर्ण व्यवसाय तात्काळ बंद करण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी अनधिकृतरित्या चाललेले सुवर्ण व्यवसाय अन्यत्र स्थलांतरित करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी देवूनही एकाही व्यवसायिकाचे स्थलांतर करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने सदर व्यवसाय अन्यत्र स्थलांतरित न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) काळबादेवी भुलेश्वर परिसरातील सुवर्णकाराकडून करण्यात येणाऱ्या सोने शुध्दीकरणाच्या व पॉलिशिंग व्यवसायिकांच्या अनधिकृत चिमण्या व अवैध रसायनांचा वापरामुळे निर्माण होणाऱ्या घातक वायू प्रदुषणासंदर्भात स्थानिक रहिवाशांनी तक्रार केलेली आहे.
(२) दिनांक ८ जानेवारी, २०१८ मध्ये झालेल्या लोकशाही दिनामध्ये सुवर्णकारागीरांना त्यांच्या व्यवसायाकरीता पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्तांनी संबंधितांबरोबर बैठक घेवून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतचे निदेश देण्यात आले होते.
(३) व (४) यानुषंगाने शासनस्तरावर बैठक नियोजित आहे.

-----------------

## जिगाव, पेनटाकळी, खडकपूर्णा, हिरडव (लोणार) (जि.बुलडाणा) येथील सिंचन घोटाळयाच्या चौकशीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(५३) * ४३६९४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्ह्यातील जिगाव, पेनटाकळी, खडकपूर्ण, हिरडव (लोणार) या सिंचन घोटाळयाचे गत ४ वर्षापासून एसीबीमार्फत सुरू असलेले चौकशीचे काम आजमितीस पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त गैरव्यवहाराच्या चौकशीची कामे पूर्ण होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर कामे प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बुलडाणा जिल्ह्यातील जिगांव प्रकल्पाची उघड चौकशी पूर्ण झाली असून चौकशीअंती गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हयाचा तपास पूर्ण झाला असून दोषारोप पत्र दाखल करण्यात येत आहे. तसेच पेनटाकळी, खडकपूर्णा, हिरडव (लोणार) या सिंचन प्रकल्पाच्या उघड चौकशीचे आदेश दिनांक १७/०१/२०१८ रोजी देण्यात आले असून सदर प्रकल्पाची उघड चौकशी सुरू आहे.

(२) व (३) बुलडाणा जिल्ह्यातील जिगांव सिंचन प्रकल्पाच्या उघड चौकशीअंती पो.स्टे. खामगांव शहर जि.बुलडाणा येथे अप.क्र. ४५२/२०१७ कलम ११९, ४२०, ४६६, ४६८, ४७१, ४७४, १९२, १९३, १९७, १९८, १२०(ब), १०९ भा.दं.वि. सह १३(१)(क)(ड), १३(२) लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून मा.विशेष न्यायालयामध्ये दोषारोप पत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## मालवणी (मालाड), मुंबई येथे जनकल्याण नगरमधील पदपथांच्या दुरवस्थेबाबत

**(५४) * ४१८५३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील मालवणी (मालाड) येथे जनकल्याण नगरमधील पदपथांच्या दुरुस्तीमुळे स्थानिकांची गैरसोय होत असून दुरुस्तीसाठी काढण्यात आलेली माती व जुने टाईल्स रस्त्यावरच टाकण्यात येत असून काही पदपथाचे काम पूर्ण होऊनही बॅरिकेड्स काढले न गेल्यामुळे अरुंद असलेल्या रस्त्यावरुन चालणे पादचाऱ्यांना अडचणीचे होत असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मालाड (प), मुंबई येथील जनकल्याण नगरमधील रस्त्याचे / पदपथाचे काम दिनांक २८/०३/०१८ रोजी पूर्ण करण्यात आले आहे. या रस्त्यांच्या पदपथांची साफसफाई तसेच बॅरिकेट्स हटविण्याचे काम दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत पूर्ण करुन सदर रस्ता रहदारीकरीता खुला करण्यात आला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## मुंबईतील अनेक सोसायटया आणि व्यावसायिक इमारती अग्निशमन यंत्रणा बसविण्यास दुर्लक्ष करीत असल्याबाबत

**(७५) * ४१९९४ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत आग लागण्याच्या घटनेमध्ये वाढत होत असताना मुंबईतील अनेक सोसायटया आणि व्यावसायिक इमारती अग्निशमन यंत्रणा बसविण्यास दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन यंत्रणा न बसविणाऱ्या सोसायटया व व्यावसायिक इमारतींवर कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत यादृच्छिकरित्या (Randomly) करण्यात आलेल्या तपासणीमध्ये काही इमारती व सोसायट्या या बसविण्यात आलेल्या अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतूदीनुसार सोसायटी अथवा व्यावसायिक इमारतींमध्ये संबंधित इमारतीच्या मालक / भोगवटादार यांनी अग्निशमन यंत्रणा बसविणे व ती सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे.

सदर नियमातील तरतुदीनुसार इमारतींमध्ये बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबतचा अहवाल फॉर्म-बी स्वरुपात संबंधित मालक / भोगवटादार यांनी प्रत्येक वर्षी माहे जानेवारी व जुलै मध्ये संबंधित अग्निशमन कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त बाबींची पुर्तता न केल्यास किंवा टाळाटाळ केल्यास अशा मालक / भोगवटादार यांचेवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात येते.

तसेच सोसायटी, व्यावसायिक इमारती यांचे मालक / भोगवटादार यांना अग्निसुरक्षेचे महत्व समजविण्यासाठी महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत जागृती मोहिम घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरा भाईंदर येथील अपना घर गृह प्रकल्प योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५६) * ४१६६३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मौजे घोडबंदर जुना सर्व्हे क्र. ४३८ नवीन सर्वे क्र. ११२/२, ३, ४, ११२/२, ११८/१, ११९/२ या खाजगी जमिनीवर अपना घर गृह प्रकल्प योजनेस दिनांक १८ फेब्रवारी, २०१७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेने बांधकाम प्रारंभ पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन इंकोसेन्सेटीव झोन, पानथळ जागा, उच्च दाबाच्या विद्युत वाहिनी असलेली तसेच सी.आर.झेड.मध्ये येत असूनही याबाबत दुर्लक्ष करुन बेकायदेशीरपणे ३००० सदनिका बांधकाम प्रारंभ पत्र देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बांधकामास संमती मिळण्यापुर्वी आगाऊ तीन वर्षा अगोदरच सदर गृह प्रकल्पाच्या मोठमोठ्या जाहिराती देशाच्या सन्माननीय पंतप्रधान यांच्या नावाचा आणि छायाचित्राचा वापर करुन लोकांची दिशाभुल करुन हजारो कोटी रुपयाची फसवणूक करण्यात आली आहे, तसेच गत दोन वर्षात याबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे फसवणूक झालेल्या नागरिकांनी केलेल्या तक्रारीवर आजपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर, सर्व्हे क्र. १११/२,३,४, ११२/२, ११८/१ व ११९/२ या जागेवर विकासक मे.सेवन इलेव्हन प्रा. लि. वास्तुविशारद मे.अविनाश म्हात्रे ॲण्ड असो. यांना महानगरपालिकेने दिनांक १८/०२/२०१७ अन्वये नकाशे मंजूरीसह बांधकाम परवानगी दिली, हे खरे आहे.

सदर परवानगी ही चटईक्षेत्र निर्देशांक १.० च्या मर्यादीत आहे.

(२) प्रस्तुत जागा ही वन विभागाच्या हद्दीपासून १०० मी. पेक्षा जास्त अंतरावर असून सदरचा गृहप्रकल्प सी. आर. झेड, Eco Sensitive Zone तसेच पानथळमध्ये समाविष्ट नाही. तसेच सदर जागेमधून उच्च दाबाची वाहिनी जात नाही, असे महापालिकेने नमूद केले आहे.

(३) व (४) सदरच्या गृहप्रकल्पाबाबत फसवणूक झालेसंदर्भात महानगरपालिकेस तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

मात्र नागरिकांकडून प्राप्त इतर तक्रारींवर महानगरपालिकेमार्फत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही नियमित करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे नारायणगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील अवैध बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(५७) * ४२६९० श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नारायणगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील स.नं. २७८ पैकी १८००.०० चौ.मी. क्षेत्रावर नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग पुणे शाखा, पुणे कार्यालयाने पत्र क्र. ४०१३, दिनांक २३/०६/२०११ अन्वये जागेच्या पूर्व

हद्दीवरील अंतर्गत मार्गाचे रस्ता पड हद्दीपासून २२.५० मी. अंतरावर वाहनतळ + ३ व भागश: ४ था मजला इमारतीस परवानगीची शिफारस केली असून या शिफारस केलेल्या इमारतीत २६ सदनिका प्रस्तावित केलेल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेची पाहणी प्र.सहायक संचालक, नगर रचना पुणे शाखा, पुणे यांनी केली असता उक्त जागेवर इमारतीचे दोन विंग असून या इमारतींच्या तळमजल्यावर चार सदनिका व त्यावरील चार मजल्यावर प्रत्येकी ८ सदनिका अशाप्रकारे दोन्ही इमारतीत एकूण ६८ सदनिकांचे नियमबाह्य बांधकाम करुन त्याचा वापर सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अवैध बांधकामाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग पुणे शाखा, पुणे यांनी दिनांक ८ जून, २०१६ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, जुन्नर-आंबेगाव उपविभाग मंचर, जि.पुणे यांना कळवूनही याबाबत कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अवैध बांधकाम निष्कासित करण्याबाबत लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांनी मा.महसूल मंत्री यांना दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी पत्राद्वारे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध बांधकाम करणाऱ्या विकासकावर गुन्हे दाखल करुन कारवाई करण्याबाबत तसेच अवैध बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३), (४), (५) व (६) सहायक संचालक, नगर रचना, पुणे यांनी दिनांक ८ जून, २०१७ रोजीच्या पत्रान्वये इमारतीचे जागेवरील बांधकाम मंजूरीची शिफारस केलेल्या बांधकामापेक्षा पूर्णपणे वेगळे असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक

नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे तरतूदीनुसार कार्यवाही करण्यास कळविले आहे. प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी, जुन्नर-आंबेगाव, उपविभाग मंचर यांनी तक्रारदार श्री.दिलीप बाजीराव घोरपडे व इतर व विकासक श्री.शरद गंगाधर फापाळे व इतर यांना सुनावणी देऊन त्यांना त्यांचे म्हणणे मांडणेची संधी दिलेली आहे.

विकासक श्री.शरद गंगाधर फापाळे व त्यांच्या पत्नी सौ.अनिता शरद फापाळे यांचेविरूध्द नारायणगाव पोलीस स्टेशन येथे दिनांक १०/०१/२०१७ रोजी तक्रारदार श्री.दिलीप बाजीराव घोरपडे यांनी फिर्याद नोंदविलेली आहे. सदर बाबतचा दावा हा ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट वर्ग १ (फौजदारी खटला) जुन्नर यांचे न्यायालयात R.C.C.HO १२२/१७ या नंबरने दाखल असून बाब न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## अमळनेर (जि.जळगांव) येथील तंबोली सिनेमा ते विप्रो कंपनी दरम्यान रस्त्यावरील रेल्वे भुयारी मार्गाची निर्मिती करण्याबाबत

**(५८) * ४३८७४ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगांव) येथील तंबोली सिनेमा ते विप्रो कंपनी दरम्यान रस्त्यावरील रेल्वे भुयारी मार्गाचा प्रस्ताव निधी अभावी नगरविकास विभागाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रेल्वे भुयारी मार्गाकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन उक्त रेल्वे मार्गाची निर्मिती करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) अमळनेर (जि.जळगांव) येथील तंबोली सिनेमा ते विप्रो कंपनी दरम्यान रस्त्यावरील रेल्वे भुयारी मार्गाचा प्रस्ताव अमळनेर नगरपरिषदेमार्फत शासनाकडे सादर करण्यात आलेला नाही.

तथापि, याबाबत मा.लोकप्रतिनिधींकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे.

-----------------

## कुही (जि.नागपूर) नगरपंचायत घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कामे नियमानुसार होण्याबाबत

**(५९) * ४२५३५ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कूही (जि.नागपूर) नगरपंचायत अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनांतर्गत करण्यात येत असलेली कामे नियमानुसार होत नसल्याने त्यावर कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांना दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी कुही विकास मंच यांनी लेखी पत्र दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. त्यानंतरही कुही विकास मंचाच्या सचिवांच्या याबाबतच्या तक्रारी “आपले सरकार” या पोर्टलवर प्राप्त झाल्या आहेत.

(२) नगरपंचायत कुही घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व प्रक्रियेबाबत कुही विकास मंचाने दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी व त्यानंतर सदर मंचाचे सचिव श्री.उमाजी पुनवटकर यांनी “आपले सरकार” या पोर्टलवर दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी तक्रार दाखल केली होती. याबाबत तक्रारदारास वस्तुस्थिती अवगत करण्यात आली आहे.

दरम्यान त्यांनी पुन्हा “आपले सरकार” या पोर्टलवर दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी तक्रार दाखल केली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन पी.पी.१) तथा प्रभारी अधिकारी, नगरपालिका प्रशासन शाखा व जिल्हा प्रशासन अधिकारी, नागपूर यांची चौकशी समिती जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजी नेमली आहे. या समितीने प्राथमिक चौकशी पूर्ण करुन अहवाल सादर केल्यावर त्यातील निष्कर्षानुसार जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून पुढील योग्य ती कार्यवाही होईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दाभोळकर व पानसरेंच्या हत्येला चार वर्षे उलटूनही संबंधित मारेकऱ्यांना अटक करण्यास पोलीस अपयशी ठरल्याबाबत

**(६०) * ४१८६० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभोळकर व पानसरेंच्या हत्येला चार वर्षे उलटूनही संबंधित मारेकऱ्यांना अटक करण्यात अदयापही पोलिसांना यश आले नसल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसआयटी व सीबीआयला मारेकऱ्यांना शोधण्यात अपयश आले असल्याची कबुली मा.उच्च न्यायालयाला दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हत्याकांडास तीन वर्षे उलटूनही आरोपींना पकडण्यास विलंब होण्यामागील कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने मुख्य आरोपींना पकडण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येच्या अनुषंगाने डेक्कन पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १५४/२०१३ भादंवि कलम ३०२, ३४ शस्त्र अधिनियम ३(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ७/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ९/५/२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर गुन्ह्याचा तपास दिनांक ३/६/२०१४ रोजी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सी.बी.आय.कडून सुरू आहे.

कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या संदर्भात कोल्हापूर जिल्ह्यातील राजारामपुरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३९/२०१५ भादंवि कलम ३०२, ३०७, १२०(ब), ३४ सह आर्म ॲक्ट ३(१)/२५ (१ब)(अ), ५(२७) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. कॉ.पानसरे यांच्या हत्येच्या गुन्ह्याच्या अनुषंगाने मा.उच्च

न्यायालय, मुंबई येथे दाखल रीट पिटीशन क्र. १५६५/२०१५ अन्वये मा.उच्च न्यायालयाचे निर्देश अनुसार अप्पर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिपत्याखाली नियुक्त केलेल्या विशेष तपास पथक (S.I.T.) करवी गुन्ह्याचा पुढील तपास फौजदारी प्रक्रिया संहीता १७३(८) प्रमाणे चालू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कॉ.पानसरे यांच्या हत्येच्या गुन्हयाच्या तपासामध्ये निष्पन्न झालेल्या चार आरोपीपैकी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, दोन फरारी आरोपींच्या अटकेकामी त्याच्याविरूद्ध फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ८२ प्रमाणे न्यायालयीन प्रक्रिया करण्यात आली असून, त्यांच्या अटकेकामी फौजदारी प्रक्रिया संहीता ७५ प्रमाणे निरंतरचे अजामीनपत्र (OPEN DATED) वॉरंट घेण्यात आलेले आहे. फरारी आरोपींच्या फोटोसह गुन्हयाची माहिती पत्रके तयार करून, ती महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस विभागास पाठविण्यात येवून त्यांची सार्वजनिक ठिकाणी प्रसिद्धी करण्यात आलेली आहे. फरारी आरोपीच्या शोधासाठी सी.बी.आय., सह देशातील अन्य काही तपास यंत्रणांसह पोलीस व गुप्तचर यंत्रणा यांच्याशी समन्वय व संपर्क साधून, फरारी आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला शहरातील एका क्रीडा संस्थेमध्ये बॅडमिंटन कोचने मुलींचे लैगिक शोषण केल्याबाबत

**(६१) * ४१३१९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील एका क्रीडा संस्थेमध्ये बॅडमिंटन कोचने १० ते १२ मुलींचे लैगिक शोषण केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या प्राथमिक तपासणीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आरोपीला कोणत्या कलमान्वये अटक करण्यात आली असून त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच कारवाईचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) फिर्यादीच्या तक्रारीवरुन दिनांक १२/०५/२०१८ रोजी सिव्हील लाईन पो.स्टे. येथे आरोपीविरूध्द गु.र.नं. २३६/२०१८ कलम ३७६ (एफ, आय, एन. के), ३५४ (अ), ५०६ भा.दं.वि. सह कलम ४, १२, १४ पोक्सो ॲक्ट, सह कलम ६६ (ई) आय. टी. ॲक्ट प्रमाणे आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस तपासात फिर्यादी मुलीवर लैगिक अत्याचार व इतर सहा मुलींचा विनयभंग झाल्याचे निष्पन्न झाले आहे. नमूद गुन्ह्यातील आरोपीस दिनांक १३/०५/२०१८ रोजी अटक करण्यात आली असून दिनांक २२/०५/२०१८ पासून न्यायालयीन कोठडी मिळाली आहे. सदर गुन्ह्यातील तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबादमधील बायजीपुरा येथील नगरसेवक व त्यांच्या भावाला भिवंडी पोलिसांनी अटक केल्याबाबत

**(६२) * ४२७६२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबादमधील बायजीपुरा येथील एका राजकीय पक्षाचा नगरसेवक व त्याचा भाऊ अनेक वर्षापासून ट्रक चोरीचा व्यवसाय करित असून भिवंडी पोलिसांनी ७० ट्रकसह सदर दोन्ही गुन्हेगारांना अटक केल्याचे माहे मे, २०१८ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिखल ठाण्यातील टाटा बॉडी बिल्डर या गॅरेजमध्ये चोरीच्या ट्रकचे चेसी नंबर बदलण्याचे व बीडच्या आर.टी.ओ.ऑफीसमध्ये या गाड्याचे रजिस्ट्रेशन केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी टाटा गॅरेजचे कर्मचारी तसेच बीड आर.टी.ओ.च्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, या प्रकरणी नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी येथे दाखल गु.र.क्र. २०/२०१८ मध्ये ३२ गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत.

(२) चिखलठाण्यातील टाटा बॉडी बिल्डर या गॅरेजमध्ये चोरीच्या ट्रकचे चेसीस नंबर बदलण्याचे काम चालत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच, बीड परिवहन कार्यालयामध्ये या गाड्यांचे नोंदणी झालेबाबतचे बनावट कागदपत्रे गुन्ह्यातील आरोपी बनवित असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(३) नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी येथे गु.र.क्र. २०/२०१८, भा.दं.वि. कलम ४६५, ४६७, ४६८, ४७४ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, एम.आय.डी.सी. सिडको पोलीस स्टेशन औरंगाबाद येथे गु.र.क्र. I १००/२०१८, भा.दं.वि. कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर दोन्ही गुन्ह्यातील २१ आरोपींपैकी २० आरोपींना अटक करण्यात आली असून १ आरोपी फरार आहे.

अद्यापपावेतोच्या तपासात बीड परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांचा सदर गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बंदर क्षेत्राच्या नियोजन प्राधिकरणाचे अधिकार मुंबई पोर्ट ट्रस्टला देण्यात आल्याबाबत

**(६३) * ४३०१४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीची ९६६.३० हेक्टर बंदर क्षेत्रावरील मुंबई महानगरपालिकेच्या नियोजन प्राधिकरणाचे अधिकारी काढून घेऊन ते मुंबई पोर्ट ट्रस्टला देण्याबाबतचा निर्णय शासनाने माहे मे, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे, मुंबई पोर्ट ट्रस्टवर शासनाचे कशाप्रकारे नियंत्रण राहणार आहे तसेच उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे आणि मुंबई महानगरपालिकेचे असलेले अधिकार काढून घेऊन ते मुंबई पोर्ट ट्रस्टला देण्याची कारणे काय आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

शासन नगरविकास विभाग अधिसूचना क्र. टिपीबी-४३१७/४९२/प्र.क्र.२८९/२०१७/नवि-११, दिनांक २३/०४/२०१८ द्वारे मुंबई पोर्ट ट्रस्टच्या अधिकारीतेखालील मुंबईच्या पूर्व किनाऱ्यालगतचे ९६६.३० हेक्टर अधिसूचित क्षेत्राकरीता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ४०(१बी) अन्वये मुंबई पोर्ट ट्रस्टची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे.

(२) व (३) मुंबई पोर्ट ट्रस्टचे अधिकारीतेखालील क्षेत्र हे पोर्टसह पोर्टचे उपक्रमासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आवश्यक सुविधा विकसित करण्यासाठी नियोजनात लवचिकता आणण्यासाठी मुंबई पोर्ट ट्रस्टची विनंती विचारात घेऊन शासनाने मुंबई पोर्ट ट्रस्टची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्तीची दिनांक २३/०४/२०१८ रोजीची अधिसूचना निर्गमित केली आहे.

मुंबई पोर्ट ट्रस्टने विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून अधिसूचित क्षेत्रासाठी नियोजन प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावली तयार करुन, प्रसिध्द करुन अधिनियमातील तरतुदीनुसार विहित केलेली कार्यवाही पूर्ण करुन शासनास मंजूरीसाठी सादर करावयाची आहे. शासनाने/अथवा संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे त्यावर अंतिम निर्णय घेण्याची तरतुद आहे.

-----------------

## ठाणे शहरातील खाजगी रुग्णालये अनधिकृत असल्याबाबत

**(६४) * ४१५९४ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील बहुतांशी खाजगी रुग्णालये जुन्या इमारतीत अनधिकृत असल्याने तसेच त्यांना भोगवटा प्रमाणपत्र नसल्याने त्याचप्रमाणे अग्नि सुरक्षेच्यादृष्टीने लागू करण्यात आलेल्या नियमात ही रुग्णालये येत नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात खाजगी रुग्णालये, प्रसूतीगृहे व नर्सिंग होम यांची नोंदणी मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट, १९४९ नुसार करण्यात येते व तद्नुषंगाने अधिनियमातील तरतुदीनुसार निकषात बसणाऱ्या खाजगी रुग्णालयांची नोंदणी उक्त अधिनियमान्वये करण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच सार्वजनिक आरोग्य संचालनालयाचे दिनांक १७/१२/२०११ च्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व रुग्णालयांना नोंदणी अथवा पुनर्नोंदणी करण्यापूर्वी संबंधित महानगरपालिका अथवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचेकडून अग्निसुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

त्यानुसार खाजगी रुग्णालयांची नोंदणी अथवा पुनर्नोंदणी करताना ठाणे महानगरपालिकेस मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट, १९४९ तसेच सार्वजनिक आरोग्य संचालनालयाच्या दिनांक १७/१२/२०११ च्या परिपत्रकातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गिरणी कामगारांसाठी म्हाडामार्फत बांधण्यात आलेल्या इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत

**(६५) * ४२०७२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सहा गिरण्यांच्या जागेवर म्हाडाने उभारलेल्या २१६४ घरांसाठी सन २०१६ मध्ये सोडत काढण्यात आली असतांना पालिकेकडून या इमारतीना भोगवटा प्रमाणपत्र न मिळाल्याने सोडतीतील विजयी गिरणी कामगारांना अद्यापही घरांचा ताबा मिळाला नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी म्हाडा अधिकाऱ्यांनी पालिकेकडे वारंवार पाठपुरावा करूनही महानगरपालिका भोगवटा प्रमाणपत्र देण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीना भोगवटा प्रमाणपत्र न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रलंबित भोगवटा प्रमाणपत्र देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) हे अंशत: खरे आहे.

सहा गिरण्यांच्या जागेवरील २६३४ सदनिकांची जाहिरात दिनांक ९/५/२०१६ रोजी काढण्यात आली आहे. सदरहू सहा गिरण्यांपैकी वेस्टर्न इंडिया मिल, प्रकाश कॉटन मिल, भारत मिल व सेंचुरी मिल या गिरणी कामगारांच्या सदनिकांना मुंबई महानगरपालिकेकडून संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे व ज्युबली मिल व रुबी मिल येथील योजनेस मुंबई महानगरपालिकेकडून भागश: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त इमारतींमधील सदनिकांचा ताबा देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२), (३) व (४) म्हाडाच्या अहवालानुसार, म्हाडामार्फत महानगरपालिकेकडे गिरणी कामगारांच्या योजनेस भोगवटा प्रमाणपत्र मिळणेकरीता वारंवार पाठपुरावा करण्यात आला आहे व त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून ४ गिरण्यांच्या जागेवरील इमारतींसाठी पूर्ण व २ गिरण्यांच्या जागेवरील इमारतींसाठी भागश: भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार भागश: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेल्या २ गिरण्यांच्या शिल्लक दोन मजल्यांकरीता म्हाडातर्फे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्याचे बाकी असल्याने पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना पाण्यासाठी टँकरची प्रतिक्षा करावी लागत असल्याबाबत

**(६६) * ४३४२१ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील पाणीटंचाई विचारात घेता महानगरपालिका प्रशासनाने १२.९ कोटीचा कृती आराखडा तयार केला असून टंचाईच्या कालावधीत भूगर्भातील पाण्याचा वापर करणे, विहिरीतील गाळ काढून पाण्याचा वापर करणे, बोअरवेलच्या माध्यमातून पाणीपुरवठा करणे इत्यादी गोष्टींचा समावेश करण्यात आला असून सदर आराखडा कागदावरच असल्याने शहरातील टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना पाण्यासाठी टँकरची प्रतिक्षा करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनपाच्या जनप्रदाय विभागाने पाठविलेल्या १२.९ कोटीच्या टंचाई कृती आराखड्याला स्थायी समिती व सभागृहाने मंजूरी दिली असून उपाययोजनांची गरज विचारात घेता आयुक्तांनी उक्त आराखड्याची त्वरीत अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आराखड्याच्या अंमलबजावणीस सुरूवात झाली नसल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर महानगरपालिका प्रशासनाने तातडीच्या पाणीपुरवठ्यासाठी रुपये १२.०९ कोटी रकमेचा कृती आराखडा तयार केला हे खरे आहे.

मात्र नागपूर शहरातील जलवाहिनी नसलेल्या भागामध्ये नियमितपणे पाणीपुरवठा करण्यासाठी ३४१ पाण्याचे टँकर्स कार्यरत असून, जलवाहिनी असलेल्या भागामध्ये काही करणास्तव पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यास अशा ठिकाणी तातडीने व मागणीनुसार पाणीपुरवठा करण्यासाठी ८० पाण्याचे टँकर्स कार्यरत आहेत. त्यामुळे टंचाईग्रस्त भागात नागरिकांना पाण्यासाठी टँकरची प्रतिक्षा करावी लागत नाही.
(२) सदरहू आराखड्यास महानगरपालिका स्थायी समितीने दिनांक ०९/०२/२०१८ रोजी मंजुरी प्रदान केल्यानंतर, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी या योजनेची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे.
(३) व (४) सदर योजनेची अंमलबजावणी महानगरपालिका प्रशासनाकडून सुरु झालेली आहे, असे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद आहे.

-----------------

## राज्यातील अकरावी पासून सुरु होणारे किमान कौशल्याधारित अभ्यासक्रम रद्द करण्यात येत असल्याबाबत

**(६७) * ४२०१४ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अकरावी पासून सुरु होणारे किमान कौशल्याधारित अभ्यासक्रम येत्या शैक्षणिक वर्षापासून बंद करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१८ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अभ्यासक्रम बंद करु नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम) बंद करण्यात आलेले नाहीत.
(२) व (३) उच्च माध्यमिक व्यवसाय (एचएससी व्होकेशनल) अभ्यासकम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (NTC) किंवा राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे प्रमाणपत्र (NCVT) मिळत नाहीत. त्यामुळे उच्च माध्यमिक व्यवसाय (एचएससी व्होकेशनल) अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक बरोबर राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (NTC) किंवा राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे प्रमाणपत्र (NCVT) देता यावे या दृष्टिकोनातून सदर अभ्यासक्रमाचे उन्नतीकरण करुन त्यांचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) किंवा व्यवसाय प्रशिक्षण संस्था (VTI) मध्ये रुपांतरण करणेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) येथील खोंडा परिसरातील पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलास पात्र लाभार्थ्यांना जागा देण्याबाबत

**(६८) * ४१८६७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील खोंडा परिसरातील पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलास पात्र परंतु जागा नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याबाबतचा विनंती अर्ज माहे मार्च, २०१८ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कार्यवाही करण्यास स्थानिक नगराध्यक्षा व मुख्याधिकाऱ्यांकडून हलगर्जीपणा केला जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) अंशत: खरे आहे. खोंडा, दापोली, ता.दापोली (जि.रत्नागिरी) येथील नागरीकांचा प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळण्याबाबतचा दिनांक ०४/१२/२०१७ रोजीचा अर्ज दापोली नगर पंचायत कार्यालयामध्ये प्राप्त झाला आहे. तथापि, प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत लाभार्थ्यांना भूखंड उपलब्ध करुन देण्याची तरतूद नाही. शासकीय जमिनीवर घर बांधून देण्याकरीता दापोली नगर पंचायतने भागीदारी तत्वावर परवडणारी घरे (AHP) या घटकांतर्गत प्रस्ताव सादर केल्यास सदर प्रस्तावांची तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर महापालिकेने शहरातील सर्व खाजगी शाळांमध्ये अग्निरोधक यंत्रणा बसविण्याबाबत

**(६९) * ४३५७९ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर महापालिकेने सन २०१२ पासून शिक्षण विभागाच्या माध्यमातून शहरातील सर्व खाजगी शाळांमध्ये अग्निरोधक यंत्रणा बसविण्यासाठी शाळा व्यवस्थापनाकडे पाठपुरावा करुनही आजतागायत बहुतांश खाजगी शाळांत सदर यंत्रणा बसवण्यात आली नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कित्येक शाळांमध्ये सदर यंत्रणा बसविण्यात आली नसल्याने विद्यार्थांची सुरक्षा धोक्यात आली असून गत दोन वर्षापूर्वी सुमारे ७० खाजगी शाळांमध्ये अग्निरोधक यंत्रणा बसवली नसल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यास सुरक्षा यंत्रणेला बचाव कार्यात अडथळे निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३)

- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ३३८ खाजगी शाळा आहेत.
- ज्या शाळांची उंची १५ मीटरपेक्षा जास्त आहे अशा शाळांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये अग्निरोधक यंत्रणा बसविणे अनिवार्य आहे.
- त्यानुसार एकूण ७५ शाळांना अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने नोटीस बजावल्या आहेत.
- सदर नोटीशीस अनुसरून २७ शाळांनी अग्निशमन उपाययोजनांची पुर्तता करून अग्निशमन विभागाचा ना हरकत दाखला प्राप्त केलेला आहे तर २८ शाळांनी अग्निशमन यंत्रणा उभारली असल्याचे नमूद केले आहे. याबाबत तपासणी करून ना हरकत दाखला देण्याचे महानगरपालिकेकडे कार्यवाहीत आहे.
- उर्वरित २० शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारण्याकामी महानगरपालिकामार्फत नोटीस बजाविण्यात आली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अनधिकृत बांधकामाबाबत महारेराकडे आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत

**(७०) * ४२८७५ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडा व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पुनर्विकासाच्या योजनांतर्गत विकासकांकडून फसवणूक होत असल्याने म्हाडा व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची कामे महारेरांतर्गत करण्याचा निर्णय घेण्यात येवून पुनर्वसन प्रकल्पांमध्ये रहिवाशांची फसवणूक होत असल्यास विकासकावर फौजदारी कारवाई करण्यात येईल असे आश्वासन मा.गृहनिर्माण मंत्री यांनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील अनधिकृत बांधकामाच्या २९३ तक्रारी प्राधिकरणाकडे प्राप्त झाल्या असून सदर बांधकामावर कारवाई करण्याची शिफारस प्राधिकरणाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने किती अनधिकृत बांधकामावर कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) म्हाडा व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पुनर्विकास प्रकल्पांना महारेरा लागू करण्याबाबतचा प्रस्ताव महारेराकडून शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(२) व (३) होय, महारेराकडे नोंदणी न झालेल्या एकूण २९३ प्रकल्पासंदर्भातील तक्रारी प्राप्त झालेल्या असून त्यापैकी ८५ प्रकल्पांविरुध्द योग्य ती कार्यवाही करणेबाबत संबंधित नियोजन प्राधिकरणांस महारेरार्माफत कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद विमानतळ विस्तारीकरणाच्या कामासाठी जमीन संपादित करण्याबाबत

**(७१) * ४१७८५ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराच्या प्रमाणबध्द विकासासाठी मुर्तजापूर, मुकूंदवाडी येथील जमिनी सिडकोमार्फत संपादित करण्याची कार्यवाही सन २०१४ मध्ये सुरु करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालिन पालकमंत्री, औरंगाबाद, व्यवस्थापकीय संचालक, सिडको, जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी मुर्तजापूर व मुकूंदवाडी येथील शेतकऱ्यांची साडेबारा टक्के विकसित भूखंडाची मागणी रास्त असल्याबाबत शासनाला शिफारस करुनही शेतकऱ्यांना त्यापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लघुसिंचन तलाव बंडित क्षेत्र, मौजे कौडगाव, (ता.जि.औरंगाबाद) येथील प्रकल्पग्रस्त विस्थापित शेतकऱ्यांना ज्याप्रमाणे गायरान जमिनीचे वाटप करण्यात आले आहे त्याच धर्तीवर सदर शेतकऱ्यांना देखील चिखलठाणा येथील गायरान जमिनी साडेबारा टक्के प्रमाणे देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सिडको नवीन औरंगाबाद प्रकल्पासाठी मौजे मुकुंदवाडी येथील जमीन सिडकोमार्फत सन १९९४ मध्ये संपादित करण्यात आली असून, मौजे मुर्तजापूर येथील जमीन सन १९८६ ते १९८८ या कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संपादित करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही

सिडकोने विमानतळ विस्तारीकरणासाठी मौजे मुकुंदवाडी येथील संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात भूधारकांना १२.५% योजनेंतर्गत लाभ दिला आहे. मात्र विमानतळ विस्तारीकरणासाठी सिडकोमार्फत संपादित केलेले ४.२० हे. क्षेत्र हे १२.५% योजना लागू होण्यापूर्वीचे असल्याने सदरहू भूधारकांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाने मौजे मुर्तजापूर येथील संपादित करून भारतीय विमान पत्तन प्राधिकरणास हस्तांतरीत केलेल्या जमिनीचा संपूर्ण मोबदला संबंधित शेतकऱ्यांना अदा केला आहे.

दिनांक २५/०२/२०१४ रोजी मा.पालकमंत्री यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाने विमानतळ विस्तारीकरणासाठी संपादित केलेल्या मौजे मुर्तजापूर येथील जमिनीच्या भूधारकांना सिडकोमार्फत १२.५% विकसित भूखंड देता येणार नसल्याबाबत सिडको यांनी दिनांक ०१/०९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये भूमिका मांडली आहे. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाने १२.५% विकसित भूखंड देण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी जमीन उपलब्ध करुन दिल्यास भूखंड वाटपाची कार्यवाही सिडकोकडून करण्यात येईल.

(३) व (४) हे खरे नाही.

तथापि, विमानतळ विस्तारीकरणासाठी संपादित केलेल्या परंतु १२.५% योजनेचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांपैकी काहींनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र. ४५९६/२०१४ दाखल करुन १२.५% जमीन वाटपाची मागणी केली असून सदरहू याचिका सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**श्री गणेश कंपाऊंड (ता.भिवंडी, जि.ठाणे) गोदामास आग लागल्याबाबत**

**(७२) * ४१६४८ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.रविंद्र फाटक, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) गुंदवली ग्रामपंचायत हद्दीतील श्री गणेश कॉम्प्लेक्स बिल्डिंगमधील गाळा क्र. १० ते २० हया दहा ऑईल व टायर गोदामास दिनांक १ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास भीषण आग लागून १२ गोदामे जळून नष्ट झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याची कमतरता असल्याने अग्निशमन दलाच्या जवानांना आग आटोक्यात आणण्यास अडचण निर्माण होत होती, पाण्यामुळे आग विझविण्याचे काम थांबवावे लागत असल्याने आग पुन्हा भडकत होती, हे ही खरे आहे काय,

(३) भिवंडी येथील गोदामांना लागणाऱ्या आगीसंदर्भातील बाब वारंवार विधानसभेत उपस्थित करुन, तसेच याप्रकरणी मा.मुख्यमंत्री यांनी कारवाईचे आदेश देऊनही येथील अनधिकृत गोदामांबाबत कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच या आगीत किती वित्तहानी झाली आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर बाबत मौ.गुंदवली, ता.भिवंडी, जि.ठाणे, येथील स. नं. ६७, ७०, ७२ या जमिनीवर आर.सी.सी. गोदामाचे बांधकाम श्री.हसमुख कंजारीया, श्री.गिरिष मेघजी हरीया, गणेश डेव्हलपर्स यांनी केले असल्याबाबतचा दिनांक २२/०४/२०१० रोजीचा स्थळ पाहणी अहवाल आहे. तसेच सदर बांधकामधारक/विकासक/मालक यांना दिनांक २२/०४/२०१० व दिनांक ०८/०२/२०११ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) व कलम ५४ प्रमाणे नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४३ सह ५२ अन्वये गुन्हा रजिष्टर क्र. II ३/११, प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर बांधकामधारक/मालक/विकासक यांना एक अखेरची संधी म्हणून दिनांक १५/०२/२०१२ रोजी अंतिम नोटीस बजावण्यात आली आहे.

तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १८८ अनधिकृत गोदामांच्या प्रकरणांमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) प्रमाणे कार्यवाही केलेली असून २७ प्रकरणांमध्ये बांधकामधारक/विकासक/मालक यांचेविरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४३ सह ५२ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ९३ प्रकरणांमध्ये पोलीस बंदोबस्त प्राप्त व्हावा याकरीता वारंवार पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यातील, १६ प्रकरणांमध्ये मा.न्यायालयाने “जैसे थे” आदेश पारीत केलेले आहेत. तसेच ६ अनधिकृत गोदामांवर निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे. ७१ प्रकरणी पोलीस बंदोबस्त प्राप्त होणे बाकी आहे. सदरची अनधिकृत गोदामांची बांधकामे निष्कासित करतेवेळी पोलीस बंदोबस्त प्राप्त व्हावा याकरीता वारंवार पाठपुरावा करण्यात येत असून पोलीस बंदोबस्त प्राप्त होताच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत निष्कासनाची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(४) सदरच्या आगीमध्ये कुठल्याही प्रकारची जिवीतहानी झालेली नाही अथवा कोणीही इसम जखमी झालेला नाही. सदर गोदामामध्ये बी.एम.डब्ल्यु. कंपनीच्या बाईक, टायर्स, ऑईल, बाईक पार्टस् इत्यादी वस्तुंचा साठा पूर्णपणे जळून खाक झाला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरामध्ये बाईक रेसर्सचे प्रमाण वाढल्याबाबत

**(७३) * ४१४८७ ॲड.अनिल परब : दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक २७०७२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरामध्ये बाईक रेसर्सचे प्रमाण वाढलेले असून बाईकस्वार बेदरकारपणे बाईक चालवित असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात वारंवार विधानपरिषदेत विविध आयुधांद्वारे शासनाने लक्ष वेधूनही आश्वासनाखेरीज कोणती कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मुंबई शहरामध्ये बेदरकारपणे दुचाकी वाहने चालवून सन २०१६ मध्ये १००४, सन २०१७ मध्ये ९२९, तर माहे मे, २०१८ पर्यंत ४५२ इतके अपघात झाले आहेत. यावरुन दुचाकी अपघाताचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते.
(२) व (३) मुंबई शहरातील वाहतुक नियंत्रण शाखेमार्फत निष्काळजीपणे मोटारसायकल चालविणाऱ्या चालकांवर मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे व वेगात मोटरसायकल चालविणाऱ्या चालकावर कलम १८३ सह ११२ मोटारवाहन कायद्याअन्वये कारवाई करण्यात येते. सदरची कार्यवाही सतत चालू राहते. सन २०१६ ते माहे मे, २०१८ अखेरपर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

| सन | निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहन चालविणे | |
|---|---|---|
| | एकूण केसेस | वसूल दंड (रुपये) |
| २०१६ | ४,११६ | १३,२७,८०० |
| २०१७ | ३,९२२ | १३,३८,००० |
| माहे मे, २०१८ | १,२९२ | १२,९१,००० |

मोटारसायकल चालवून रेस करणाऱ्या मोटारसायकल स्वारांना प्रतिबंध व्हावा म्हणून मोटार सायकल रेसींग होणाऱ्या संभाव्य ठिकाणी वाहतुक विभागामार्फत विशेष मोहिम राबवून नाकाबंदी करुन अशा दुचाकी वाहनचालकांवर मोटारवाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येते. तसेच

मोटारसायकल रेसींगमध्ये अपघात होऊन जिवीतहानी होऊ नये याकरीता वाहतुक विभागामार्फत शाळा, महाविद्यालयामध्ये जाऊन तसेच सोशल मिडियाद्वारे संदेश प्रसारित करुन तरुण मुलांचे प्रबोधन करण्यात येते.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## पुणे शहरातील एल.ई.डी.प्रोजेक्ट चुकीच्या पध्दतीने कार्यान्वित झाल्याबाबत

**(७४) * ४२६०७ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील महत्त्वाकांक्षी एल.ई.डी. प्रोजेक्ट हा टाटा प्रोजेक्ट प्रा.लि. या कंपनीला देण्यात आला असून टाटा कंपनी व पुणे महानगरपालिका अधिकाऱ्यांनी संगनमत करुन महापालिकेने दिलेल्या अटी व नियमांचे उल्लंघन करुन पुणे महानगरपालिकेची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगरपालिका अधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचे पैसे वर्क ऑर्डरप्रमाणे टाटा कंपनीस न देता उज्वल कंपनीस देण्यात आले असून टाटा कंपनीकडून घेतलेली अनामत रक्कम रुपये २५ कोटी नियमाप्रमाणे महाराष्ट्र बँकेत जमा न करता खाजगी बँकेत जमा करुन प्रोजेक्टचे स्काडा ही करण्यात आले नसून सदर प्रोजेक्ट मान्यतेच्या प्रकरणात अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका पुणे यांचे कोणतेही अभिप्राय घेण्यात आले नसल्याची बाब माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर दोषी अधिकाऱ्यांवर व टाटा कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३)

- पुणे शहरातील एल.ई.डी.प्राजेक्टबाबत वृत्तपत्रात बातमी प्रसिध्दी झाल्याची बाब खरी आहे.
- सदर प्रकल्पासाठी महापालिकेने सन २०१६ मध्ये निविदा प्रसिध्द केली होती. प्रकल्पाची किंमत ९० कोटी इतकी आहे.
- यामध्ये महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांवर ७७ हजार एल.ई.डी. पथदिवे सेन्ट्रलाईज कंट्रोल ॲण्ड मॉनिटरिंग सिस्टिम (स्काडा) सह बसविणे अभिप्रेत होते.
- या योजनेमध्ये झालेल्या कामांची त्रयस्थ तांत्रिक तपासणी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे मार्फत करण्याचे महानगरपालिकेने निश्चित केले आहे.
- सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया, अंमलबजावणी, वित्त विषयक बाबी या प्रक्रियेत संदिग्धता असल्याचे व निविदा प्रक्रिया, लेखाविषयक तरतूदी, प्रचलित विहित नियम यांचे पूर्ण पालन झाले नसल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास येते आहे.
- त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेची शासनामार्फत कालमर्यादीत चौकशी करण्यात येईल व त्यातील निष्कर्षानुसार आवश्यक ती नियमोचित कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पोलादपूर (जि.रायगड) शहरातील तांबडभुवन ग्रामस्थांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(७५) * ४३३२० श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर (जि.रायगड) शहरातील तांबडभुवन येथील ग्रामस्थांना पाणीपुरवठा योजनेतून किडे आणि शेवाळयुक्त पाणीपुरवठा झाल्याचे माहे एप्रिल-मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजना सन २००९ सालापासून अपूर्णावस्थेत असून आजतागायत फिल्टरेशन प्लांट न उभारल्याने पोलादपूरकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पोलादपूर येथील ग्रामस्थांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पोलादपूर शहरातील तांबडभुवन येथील पाणीपुरवठा पाईपलाईनमध्ये गळती झाल्याची तोंडी तक्रार स्थानिक नागरीकांनी पोलादपूर नगरपंचायत प्रशासनाकडे केली होती.

प्राप्त तोंडी तक्रारीनंतर पोलादपूर नगरपंचायतीने सदर गळती तातडीने दुरुस्त करुन घेतली, मात्र दूषित पाणीपुरवठा झाला नसल्याचे, नगरपरिषदेने कळविले आहे.

(२) पोलादपूर ग्रामपंचायत अस्तित्वात असताना सन २००८-०९ मध्ये भारत निर्माण योजनेंतर्गत पोलादपूर नळपाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली.

सदर योजनेबाबत जागेच्या वादावरुन न्यायालयीन प्रकरण दाखल झाल्यामुळे योजनेचे सन २०१५ पर्यंत ८५ टक्के कामच पूर्ण होऊ शकले.

सदर योजनेतील १५०० मी. ची वितरण व्यवस्था व जलशुध्दीकरण संयत्राचे काम अपूर्ण आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सद्य:स्थितीत पाण्याच्या टाकीमध्ये ब्लिचिंग पावडरचा वापर करुन अस्तित्वात असलेल्या पाईपलाईनद्वारे शुध्द पाण्याचा पुरवठा नगरपंचायतीमार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी योजना पूर्ण करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) शहरात कामगार कल्याण भवन उभारण्याबाबत

**(७६) * ४१७९४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली शहरातील कामगारांच्या वेतनातून कपात होणाऱ्या कामगार कल्याण निधीतून सुमारे एक कोटी पेक्षा अधिक महसूल शासनाला मिळत असून या कामगारांना कामगार कल्याण मंडळामार्फत सुविधा मिळाव्यात यासाठी कामगार विभागास स्थानिक लोकप्रतिनिधीच्या पाठपुराव्यातून २२ गुंठे भूखंड महसूल विभागाकडून माहे डिसेंबर, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत साडेचार वर्षाच्या कालावधीत सदर भूखंडावर कामगार विभागाने कामगार कल्याण भवन बांधण्यासाठी कार्यवाही केलेली नाही तसेच प्रतिवर्षी या विभागातून कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळत असताना कामगार व त्यांच्या परिवाराला सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कामगार विभागाकडून जाणीवपूर्वक दूर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगार व त्यांच्या कुटूंबियांना हक्काच्या सोयी-सुविधा मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) महसूल व वन विभागाने दिनांक १७/१२/२०१३ च्या पत्रान्वये सदर भूखंड मंडळास देण्यास मान्यता दिली आहे.

(२) सदर भूखंडावर छोटे केंद्र बांधण्याबाबत मंडळाने ई-निविदा प्रक्रिया राबविली होती. त्यानुसार रुपये ३१,१३,२८२/- इतक्या रकमेस केंद्र उभारण्यासाठी ठेकेदारास कार्यादेश देण्यात आले होते. परंतु, सदर निविदा प्रक्रियेस शासनाची मान्यता घेतली नसल्याने शासनाने सदर ई-निविदा रद्द केली व मंडळाने नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार वास्तुविशारद नियुक्तीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) व (४) सदर प्रकल्पासाठी चार वास्तुविशारदांनी ई-निविदा भरली आहे. प्राप्त निविदांची छाननी सुरु आहे. निविदांची छाननी झाल्यानंतर वास्तुविशारद नियुक्ती करण्यात येईल. तद्नंतर प्रकल्प बांधकामासाठी ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

-----------------

## नवी मुंबई महापालिकेने बांधलेल्या बाजार इमारती तसेच रूग्णालये पूर्ण क्षमतेने सुरू करण्याबाबत

**(७७) * ४३६९५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील फेरीवाल्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी महापालिकेने अनेक ठिकाणी बाजाराकरीता इमारती उभारल्या आहेत तसेच बेलापूर, नेरूळ, ऐरोली आदि ठिकाणी रूग्णालयाकरीताही इमारती उभारण्यात आलेल्या असून गत ५ वर्षापासून उक्त बाजाराची व रूग्णालयाची इमारत वापराविना असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी बाजाराकरीता बांधलेल्या इमारतींमध्ये दारूडे गर्दुल्यांचा वावर ही वाढला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बाजार तसेच रूग्णालयाची इमारत विनाविलंब पूर्ण क्षमतेने सुरु करण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सिडको महामंडळाने महापालिकेकडे फेरीवाल्यांसाठी हस्तांतर केलेल्या हॉकर्स झोन/डेली मार्केटच्या ४५ भूखंडापैकी ०९ भूखंडावर महापालिकेने मंडई विकसित केलेल्या आहेत.

सदर मंडईमध्ये परवानाधारक फेरीवाल्यांना पिचेसचे / जागांचे वाटप महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेले असून ते तेथे आजमितीस व्यवसाय करीत आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेंतर्गत सार्वजनिक रूग्णालय वाशी, नेरूळ व ऐरोली तसेच माता बाल रूग्णालय बेलापूर व २२ नागरी प्राथमिक केंद्र कार्यान्वित आहेत.

वाशी येथील ३०० खाटांचे रूग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असून नेरूळ व ऐरोली येथील रूग्णालयात सद्य:स्थितीत बालरोग व स्त्रीरोग विभाग पूर्ण क्षमतेने कार्यान्वित आहेत, तर माता बाल रूग्णालय बेलापूर येथे बालरोग, स्त्रीरोग व बाह्यरूग्ण विभाग कार्यान्वित आहे.

(२) बाजाराकरीता बांधण्यात आलेल्या मंडईमध्ये परवानाधारक फेरीवाले व्यवसायकरीत असून तेथे दारूडे गर्दुल्यांचा वावर आहे, अशी वस्तुस्थिती नाही.

(३) नवी मुंबई महानगरपालिका सार्वजनिक रूग्णालय ऐरोली, नेरूळ व माता बाल रूग्णालय बेलापूर करीता २८ प्रकारची रूग्णालयीन उपकरणे उपलब्ध करण्यात आलेली असून उर्वरित उपकरणांसाठी व आवश्यक मनुष्यबळ नियुक्ती करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडाळा, मुंबई येथे पदपथ खोदण्यात आले असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत

**(७८) * ४२२४८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा, मुंबई पश्चिमेकडे बेस्टतर्फे वीज वाहिनी टाकण्याचे काम ठिकठिकाणी सुरु असल्याने अनेक ठिकाणी पदपथ खोदण्यात आले असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडाळा पश्चिम स्थानकानजिकचा बहुतांश भागामध्ये सदरहू काम सुरु असल्यामुळे अडथळे पार करुन रस्ता ओलांडणे जेष्ठ नागरिक व दिव्यांगाना धोकादायक ठरत असल्यामुळे उक्त काम पूर्ण करण्याबाबत शासनस्तरावर कोणती आवश्यक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : (१) वडाळा (प) येथील टिळक रोड ते जी.डी. आंबेडकर मार्गापर्यंत वीज वाहिनी टाकण्यासाठी माहे एप्रिल-मे, २०१८ मध्ये पदपथ खोदण्यात आले होते ही वस्तुस्थिती आहे.
(२) खोदकामामुळे नागरिकांची गैरसोय होऊ नये याकरीता खबरदारी उपाय म्हणून बेस्ट उपक्रमाने संरक्षक भिंत, सूचना फलक, खड्डे ओलांडण्याकरीता लाकडी फळ्यांची व्यवस्था केली होती.

सद्य:स्थितीत सदर काम पूर्ण झाले असून तेथील खड्डयांची पुनर्भरणी करुन पदपथ/रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुर्ववत करण्यात आले असल्याचे बेस्ट प्रशासनाने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेवर कारवाई करण्याबाबत

**(७९) * ४१६७० श्रीमती विद्या चव्हाण** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार, जीवदाणी रोड येथील श्री.विकास झा या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तरुणांने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.युनुस शेख आणि पोलीस अधीक्षक, पालघर श्री.मंजुनाथ शिंगे यांच्या गैरवर्तणूक व अपमानास्पद वागणुकीला कंटाळून उपविभागीय पोलीस अधिकारी, वसई येथील कार्यालयात दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.विकास झा यांचा भाऊ श्री.अमित झा यांनी आपल्या भावाच्या आत्महत्येबाबत दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी म्हणून पाठपुरावा केला होता परंतु, पोलिसांच्या मानसिक त्रासाला कंटाळून श्री.अमित झा यांनी सुध्दा दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास अर्नाळा येथे आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही तरुणांनी मृत्यूपुर्व जबानीमध्ये संबंधित पोलीस अधिकाऱ्यांची नावे घेतली असून श्री.विकास झा यांच्या जबानीची चित्रफीत पोलिसांनी जप्त करुन तपासणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मृत्यूपुर्व जबाणीला महत्वाचा पुरावा गृहित धरुन पोलीस अधीक्षक व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) विरार, जीवदाणी रोड येथील श्री.विकास झा या तरुणाविरुध्द ८ दखलपात्र व १० अदखलपात्र गुन्हे दाखल आहेत. तसेच त्यांचेवर हद्दपार प्रस्ताव देखील आहे. सदर गुन्ह्यापैकी एका गुन्ह्यातील त्यांचेविरुध्द होणारी कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, वसई येथील कार्यालयात आत्महत्या केली, हे खरे आहे. सदर प्रकरणी माणिकपूर पोलीस ठाणे, जि.पालघर येथे गुनोंक्र ३१०/२०१७ भा.दं.वि.स. कलम ३०९, ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.
(२) मयताच्या आत्महत्येबाबत त्यांच्या भावाने पाठपुरावा केला असता चौकशीच्या अनुषंगाने माणिकपूर पोलीस ठाणे गु.र.नं. १८/२०१८ भादंवि कलम ३०६ प्रमाणे एका आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. त्यांनतर अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत मयताच्या भावाने आत्महत्या केली. मयताच्या वडीलांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ४ आरोपींविरुध्द अर्नाळा सागरी पो.ठाणे गु.र.नं. १३/२०१८ भादंविस कलम ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

(३) मयत याने आत्महत्या करण्यापूर्वी चित्रफीत तयार करुन सोशल मिडीयावर प्रसारित केली होती. सदर चित्रफीत जप्त करण्यात आली आहे.
(४) उपरोक्त प्रकरणी दाखल असलेले माणिकपुर पो.ठाणे गु.र.नं. १८/२०१८ भादंविस कलम ३०६ व अर्नाळा सागरी पो.ठाणे गु.र.नं.१३/२०१८ भादंविस कलम ३०६, ३४ या दोन्ही गुन्ह्यांचा तपास होणे कामी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी), कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे देण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.